| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक २७८ वा | मंगळवार दिनांक २० जानेवारी, २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹ RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### प्राण्यांना निर्दयपणे वागणुक देवून रेड्याची टक्कर लावणाऱ्यावर गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव ग्रामीण पोलीस ठाणे महेश , रा. उंबरे कोठा धाराशिव, बाजीराव, रा. राघुचीवाडी, अमित, रा. सांजा चौक धाराशिव, भाउ , रा. जुना बस डेपो धाराशिव, मोहसिन, रा. धाराशिव, अकबर रा. धाराशिव, अकबर, अनिकेत गजने, रा. धाराशिव यांनी दि. १८.०१.२०२६ रोजी वलगुड शिवारात बेकायदेशीरपणे रेड्यांचे टक्करीचे आयोजन करुन रेड्यांची आपसात टक्कर लावुन निर्दयतेने व क्रुरतेने वागणुक देवून त्यांना जखमी केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे नमूद व्यक्तींविरुध्द प्राण्यास क्रुरतेने वागण्यास प्रतिबंध अधिनियम कलम ११(१)(अ),११(१)(एम), ११ (१)(एन) सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पंप, स्टार्टर व केबलची चोरी

कळंब (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- सुरेश हरीदास फरताडे, वय ४७ वर्षे, रा. मस्सा खं. ता. कळंब जि. धाराशिव यांचे मस्सा शिवारातील शेत गट नं ६७८ मधील विहीरीवरील ०३ एच पी कंपनीचा पंप व स्टार्टर १०० फुट वायर एकुण २२,९७१ किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने दि.०५.०१.२०२६ रोजी ०६.०० ते दि. ०६.०१.२०२६ रोजी १०.०० वा. सु. चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सुरेश फरताडे यांनी दि.१८.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### पाच एचपीची मोटारीची चोरी

मुरुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे- शरद अशोक भोसले, वय ३८ वर्षे, रा. कंटेकुर ता. उमरगा जि. धाराशिव यांनी बटईने केलेल्या कंटेकुर शेत शिवारातील शेत तळ्यातील एक लक्ष्मी कंपनीची ५ एचपीची मोटार अंदाजे १०,००० किंमतीची अज्ञात व्यक्तीने दि.१७.०१.२०२६ रोजी चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शरद भोसले यांनी दि.१८.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

### स्प्रिंकलर पाईपची चोरी

उमरगा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी भुषण सुधाकर गायकवाड, वय ३३ वर्षे, रा. औराद ता. उमरगा जि. धाराशिव यांचे जकेकुर शिवारातील शेतातील स्प्रिंकलरचे लोखंडी पाईप नोजलसह एकुण ०५ नग अंदाजे ७,५०० किंमतीचे दि.१२.०१.२०२६ रोजी अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-भुषण गायकवाड यांनी दि.१८.०१.२०२६रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन उमरगा पो ठाणे येथे सं.कलम ३०३ (२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव येथील भव्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्याला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित राहणार



धाराशिव(प्रतिनिधी) मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीच्या वतीने एक हात मदतीचा उपक्रमांतर्गत धाराशिव येथे रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित केलेल्या मोफत जिल्हास्तरीय (बिगरहुंडा) सामुदायिक विवाह सोहळ्याला महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री स्वतः उपस्थित राहणार असल्याची माहिती समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी दिली.

मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे, माजी अध्यक्ष अमरसिंह देशमुख, संजय मुंडे, धनंजय राऊत यांनी मुंबई येथे नंदनवन बंगल्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन निमंत्रण पत्रिका दिली. समितीच्या वतीने आयोजित केलेल्या सामुदायिक विवाह सोहळ्याला उपस्थित राहण्याबाबत विनंती केली. तसेच समितीच्या वतीने आयोजित करण्यात येणार्या विविध समाजोपयोगी व प्रबोधनपर उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर उपमुख्यमंत्री महोदयांनी सोहळ्याला धाराशिव येथे प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची ग्वाही दिल्याचे समितीच्या वतीने अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी सांगितले.

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले समितीच्या कार्याचे कौतुक**

'धाराशिव जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे न भरून येणारे नुकसान झाले होते. तेथील लोकांना या आयोजित विवाह सोहळ्यातून नक्कीच दिलासा मिळणार आहे, विवाह सोहळा आयोजित



केल्याबद्दल तुमचे विशेष अभिनंदन' अशा शब्दात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या भावना व्यक्त करुन मध्यवर्ती सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समितीचे कौतुक केले असेही समितीचे अध्यक्ष आकाश मिलिंदराव कोकाटे यांनी सांगितले.

## जिल्हा परिषद रणधुमाळी! जागावाटपावर शिवसेना-भाजपमध्ये तणाव, सावंतांची भूमिका ठरणार निर्णायक



धाराशिव (शेख अंजुम)- जिल्हा परिषद व पंचायत समिति निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धाराशिव जिल्ह्यात राजकीय हालचालींना प्रचंड वेग आला असून, शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यातील युतीतील जागावाटपाचा तिढा अधिकच घट्ट होताना दिसत आहे. मुंबईत पार पडलेल्या शिवसेना शिंदे गटाच्या नेते व पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत आमची सगळी ठरली आहे, योग्य वेळी कळवू असा स्पष्ट संदेश देण्यात आला असला तरी प्रत्यक्षात अनेक तालुक्यांत अस्वस्थता वाढली आहे. कळंब तालुक्यात केवळ दोन जागा देण्याचा भाजपचा प्रस्ताव असल्याची माहिती असून, यावर शिवसेनेत तीव्र नाराजी आहे. धाराशिव तालुक्यातही काही जागांवर तडजोडीची भूमिका घेतली जात असल्याचे चित्र आहे. काही स्थानिक शिवसैनिकांनी भाजपशी थेट संपर्क साधत वैयक्तिक स्वार्थासाठी हालचाली केल्याचा आरोपही शिवसेनेकडून केला जात आहे. जागावाटपात अन्याय झाला तर युती धोक्यात येऊ शकते, अशी ठाम भूमिका काही पदाधिकाऱ्यांनी मांडली असली तरी वरिष्ठ स्तरावर आदेश पाळा, वाद वाढवू नका असा स्पष्ट इशारा देण्यात आला आहे.

भूम, परंडा, वाशी, धाराशिव, कळंब आणि तुळजापूर या सहा तालुक्यांतील अनेक पदाधिकारी व शिवसैनिक आमदार प्रा. डॉ. तानाजीराव सावंत यांच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. दरम्यान, आमदार डॉ. तानाजीराव सावंत सोमवारी धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून, त्यांनी बैठका आयोजित केल्याने त्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची व निर्णायक ठरणार आहे. युती टिकवायची की स्वतंत्र वाटचाल करायची, याबाबत सावंत काय भूमिका घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. एका बाजूला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पक्षश्रेष्ठी म्हणून आदेश, तर दुसऱ्या बाजूला पुण्याचे धनंजय सावंत यांच्या माध्यमातून भाजप प्रवेशाची 'दुहेरी व्यूहरचना' चर्चेत आहे. सावंत गटाने सर्व बाजूंनी राजकीय कोंडी करण्याची तयारी सुरू केली असून, काही शिलेदारांना फोडण्यासाठी थेट संपर्क अभियानही राबवले जात असल्याची चर्चा आहे. उमरगा व लोहारा तालुक्यांत पुढे काय घडणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असून, उमरगा नगरपरिषदेतील शिवसेना शिंदे गट व काँग्रेसमधील समीकरणांमुळे राजकीय गणिते आणखी गुंतागुंतीची होत आहेत. एकंदरीत जिल्हा परिषद निवडणुकांच्या निमित्ताने धाराशिव जिल्ह्यात राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून, येत्या काही दिवसांत मोठे निर्णय आणि धक्कादायक घडामोडी समोर येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## हरिभाऊ घोगरे हायस्कूल,उपळे (मा.) येथे 'हिंद की चादर' श्री गुरु तेग बहादूर यांना अभिवादन




धाराशिव (जिमाका) धाराशिव तालुक्यातील उपळे (मा.) येथील हरिभाऊ घोगरे हायस्कूलमध्ये १७ जानेवारी रोजी 'हिंद की चादर' म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या ३५० व्या शहीदी वर्षानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.या कार्यक्रमाची सुरुवात प्रशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या प्रतिमेचे विधिवत पूजन करून केले.यावेळी व्यासपीठावर प्रशाळेचे मुख्याध्यापक श्री.टी.डी.कांबळे,शिक्षक श्री.ए.बी. क्षीरसागर,श्रीमती घोगरे व श्रीमती वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शिक्षक सचिन कांबळे यांनी श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या जीवनकार्यावर सविस्तर प्रकाश टाकला.वैराग्य,धैर्य,धर्मसंरक्षण तसेच धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी त्यांनी दिलेले महान बलिदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी सांगितले. त्यांच्या अतुलनीय त्यागामुळेच भारतीय समाजात मानवतावादी मूल्ये,सहिष्णुता व राष्ट्रनिष्ठेचा संदेश दृढ झाला,असे मत त्यांनी व्यक्त केले.

या मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रभक्ती, सामाजिक सलोखा आणि मानवतेची जाणीव निर्माण झाली.उपस्थित सर्वांनी श्री गुरु तेग बहादूर जी यांच्या बलिदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे आभार श्री.ए.बी.क्षीरसागर यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम श्रद्धा, शिस्तबद्धता व प्रेरणादायी वातावरणात उत्साहपूर्वक पार पडला.

## जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन पाणीपुरवठ्याचा घेतला आढावा: विरोधी पक्ष काँग्रेस नगरसेवक अॅक्शन मोडवर

धाराशिव (प्रतिनिधी) - तुळजापूर पालिकेतील विरोधी पक्ष काँग्रेस नगरसेवक अॅक्शन मोडवर आले असून काँग्रेस नगरसेवकांनी पालिकेचा जलशुद्धीकरण केंद्राला भेट देऊन पाणीपुरवठ्याचा आढावा घेतला. यावेळी जलशुद्धीकरणासाठी आवश्यक ब्लिचिंग पावडर, तुरटी साठ्याची माहिती घेतली. दरम्यान प्रशासकराज मुळे सुस्तावलेल्या पालिका कर्मचाऱ्यांचे विरोधी नगरसेवकांचा अचानक पाहणी दौऱ्यामुळे धाबे दणाणले आहे. तुळजापूर नगर पालिकेचा सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस पक्षाचे ०५ नगरसेवक निवडून आले असून प्रभावी विरोधी पक्ष म्हणून काँग्रेस नगरसेवकांनी काम सुरू केले आहेत. काँग्रेसचे गटनेते अमोल कुतवळ यांच्यासह रणजीत इंगळे, आनंद जगताप, अक्षय परमेश्वर आदी नगरसेवकांनी पालिकेच्या नळदुर्ग रोडवरील जलशुद्धीकरणाला भेट देऊन पाहणी केली. यावेळी जलशुद्धीकरण केंद्रातील अस्वच्छते विषयी नाराजी व्यक्त करत कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. जलशुद्धीकरणासाठी आवश्यक ब्लिचिंग पावडर, तुरटी साठ्याची माहिती घेतली. शहरात नळाद्वारे स्वच्छ पाणीपुरवठा करण्याबाबत पालिका कर्मचाऱ्यांना सुचना करण्यात आल्या. शहरातील नागरिकांना स्वच्छ पाणीपुरवठा करण्यात बाबत कर्मचाऱ्यांना सुचना करण्यात आली. दरम्यान गेल्या ०५ वर्षापासून पालिकेत प्रशासकराज असल्यामुळे कर्मचारी सुस्तावले असून विरोधी नगरसेवकांचा अचानक पाहणी दौऱ्यामुळे सुस्तावलेल्या पालिका कर्मचाऱ्यांचे धाबे दणाणले आहे.

लेट लतीफांवर कारवाई करा दरम्यान पालिका कार्यालयात अनेक कर्मचारी उशीरा येत असून यामुळे नागरिकांना प्रतिक्षा करावी लागत आहे. विशेष म्हणजे पालिकेतील बायोमेट्रिक मशीन केवळ शोभेसाठी असून कर्मचाऱ्यांना बायोमेट्रिक हजेरी ची सख्ती करून पालिकेतील लेट लतीफ कर्मचाऱ्यांवर कारवाई साठी विरोधी नगरसेवकांनी पुढाकार घेण्याची मागणी होत आहे.

## राज्य क्रीडा दिनानिमित्त जिल्ह्यात विविध क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

धाराशिव (जिमाका) - राज्य क्रीडा दिनानिमित्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे यांच्या अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, धाराशिव तसेच विविध क्रीडा संघटना व संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यात स्केटींग,मैदानी खेळ,कुस्ती, तायक्वांदो,खो-खो,बुद्धीबळ, नेटबॉल,डॉजबॉल,बॅडमिंटन आदी विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या क्रीडा दिनानिमित्त १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,रुईभर येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी ऑलिम्पिक पदक विजेते कै.खाशाबा जाधव व हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून श्रीफळ अर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य श्री. जयप्रकाश कोळगे हे होते.प्रमुख पाहुणे म्हणून श्री.राजकुमार सोमवंशी,शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी तथा महाराष्ट्र राज्य तलवारबाजी संघटनेचे खजिनदार, तसेच श्री.बी.के.नाईकवाडी,तालुका क्रीडा अधिकारी आणि क्रीडा मार्गदर्शक श्री.विश्वास खंदारे हे उपस्थित होते.

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना प्राचार्य श्री.जयप्रकाश कोळगे यांनी सांगितले की,अत्यल्प सुविधा असतानाही खाशाबा जाधव यांनी कुस्तीच्या स्पर्धेत कांस्यपदक मिळवून देशाचा नावलौकिक वाढविला. सुविधा नसतानाही त्यांनी देशासाठी कठोर परिश्रम घेतले.त्यांनी शिक्षणाबरोबरच खेळाचे महत्त्व ओळखले होते. कोणतेही कार्य परिश्रमानेच पूर्ण होऊन यश मिळते, त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक आपले ध्येय साध्य करावे,असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे श्री.बी.के. नाईकवाडी,तालुका क्रीडा अधिकारी यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले की,जिंकण्याची जिद्द आणि हारण्याची भीती मनात नसलेला व्यक्तीच खरा खेळाडू असतो. खेळामध्ये सातत्य व नियमित सराव अत्यंत महत्त्वाचा असून त्यातूनच यश मिळते.सर्वांनी मैदानी खेळ खेळल्यास शारीरिक स्वास्थ्य उत्तम राहते.खेळातील नियमावली अंगीकारल्यास जीवनातही शिस्त निर्माण होऊन चांगली कार्यसिद्धी साधता येते.याप्रसंगी शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारार्थी श्री. राजकुमार सोमवंशी यांच्या शुभहस्ते डॉजबॉल क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमास प्राचार्य जयप्रकाश कोळगे,प्रशासकीय अधिकारी शिवकन्या साळुंके,श्री स्वामी समर्थ कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य संतोष कपाळे,इंदिरा गांधी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नानासाहेब शेलार,पर्यवेक्षक काकासाहेब डोंगरे,शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.गणेश शेटे यांनी केले,आभार श्री.सचिन कांबळे यांनी मानले.

## डॉ.बापूजी साळुंखे विधी महाविद्यालयाच्या रक्तदान शिबीरास उत्स्फूर्त प्रतिसाद




धाराशिव (प्रतिनिधी) - डॉ बापूजी साळुंखे लॉ कॉलेज, धाराशिव येथे श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य श्री. अभयकुमार साळुंखे यांच्या जन्मदिवसाचे औचित्य साधून शुक्रवार १७ जानेवारी रोजी रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते. हा दिवस संस्थेच्या वतीने ज्ञान शिदोरी दिवस म्हणून साजरा केला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य कायला कृष्ण मुर्ती, सह्याद्री ब्लड बँकेचे नानासाहेब करंजकर, यांनी स्वामी विवेकानंद व डॉ बापूजी साळुंखे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन केले.

यावेळी ५१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सहभाग नोंदवला. रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

प्राचार्य डॉ. कायला कृष्ण मुर्ती यांनी, श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेची कार्यप्रणाली, डॉ बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक, सामाजिक कार्य व कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे यांच्या जन्मदिनी साजरा केला जाणाऱ्या 'ज्ञान शिदोरी' दिनाचे महत्त्व या विषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. अजित शिंदे यांनी जबाबदारी पार पाडली.

यावेळी डॉ. स्मिता कोल्हे, डॉ व्हि.जी शिंदे,डॉ नितिन कुंभार, डॉ संजय आंबेकर, डॉ इक्बाल शाह, डॉ. पौर्णिमा तापडिया, प्रा . कैलास शिकारे,प्रा अमोल कुलकर्णी, प्रा. दीपिका स्वामी, प्रा. अनुप कवठाळकर यांच्या समवेत कार्यालयीन कर्मचारी संभाजी बागल,रोहित क्षीरसागर,आकाश कवडे , बशीर आतार, ग्रंथपाल गायकवाड, अर्चना गरड व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

लातूर समाचार

# भाजपावर मोठी जबाबदारी आली

राज्यातील विधानसभा, नगरपरिषदाच्या निवडणुका नंतर महागनरपालिकेची निवडणुकीत पार पडली. यात भाजपाला चांगले भरघोश यश मिळविता आले. भाजपा एक नंबरचा पक्ष ठरला आहे. अशात स्थानिकस्वराज्य संस्था म्हणजे जिल्हापरिषदेची निवडणुक कार्यक्रम चालू आहे. उमेदवारी दाखल करण्यात येत आहे. यात कोणात्या पक्षाला ग्रामीण मतदार स्विकारले याचा अंदाज येत नाही. जेंव्हा उमेदवारी निश्‍चित होईल त्यावेळी कळून येणार आहे. सध्याला उमेदवारी पक्षाकडे मागणी होत असून लवकरच उमेदवारी कोणाला द्यायची या बाबत निश्‍चिती होणार आहे. त्यामुळे भाजपाला ग्रामीण भागात मोठा जोर लावावा लागणार आहे. जसे विधानसभा, नगरपरिषद व महानगरपरिषदेत यश मिळेल तसे मिळावे वाटत असेल तर ग्रामीण भागातील शेतकऱ्याकडे लक्ष द्यावे लागणार आहे. ग्रामीण भागातील मतदार हे जिल्हापरिषद व पंचायत समितीचे मतदार असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील समस्या सोडविण्याचा विचार झाला पाहिजे. शेतकरी अधिक प्रमाणात जीवन संपवित आहेत. शेतमालास योग्य भाव मिळत नाही अशी ओरड आहे त्याकडे गांर्भीयाने लक्ष दिले जात नाही. आज पर्यंत ज्या निवडणुका झाल्या त्या शहरी भाग व सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या वर्गात झाल्या आहेत. महानगरपालिकेत लातूर व चंद्रपूर येथे भाजपाला अपयश आले. यामागील कारणे तसे आहेत. येथे काँग्रेसला स्विकारला याचा अर्थ भावनिकतेचा परिणाम आहे. आता जनता मतदार विचार करते देशात भाजपा व राज्यात भाजपाची सत्ता आहे. आपल्या लातूर महानगरपालिकेच अनुदान कसे येणार, निधीची उपलब्धता कशी होणार? याच विचारात दिसून येत आहे. चिंता भेडसावत आहे. वास्तविक विचार योग्य का अयोग्य आहे यात न जाता लातूर ज्यावेगाने जात होते त्याच वेगाने जाणे आवश्यक आहे. सत्ताधाऱ्याच्या हाती जर स्थानिक स्वराज्य संस्था असतील तर निधी बऱ्या प्रमाणात मिळतो अशी समज आहे. असो जे झाले ते झाले आता सर्वांचे लक्ष जिल्हा परिषदेच्या निवडणुकीकडे लागणार आहे. यात सत्ताधारी भाजपाला कसे यश मिळते हे पाहाणे औचित्याचे ठरणारे आहे. राज्यात अजित पवार व शरद पवार यांच्या पक्षाची स्थिती वाईट दिसून येत आहे. घड्याळ व तुतारीस जनतेनी मोठ्या प्रमाणात नाकारले आहे या बाबत पवार यांनी चिंतन केले पाहिजे. राज्याचे उपमुख्यमंत्री व अर्थखाते हाती असताना जनतेनी नाकारले आहे. वाईट आवस्था झाली आहे. लातूर सारख्या शहरात तुतारीचा एक ही उमेदवार विजयी झाला नाही तर अजित पवार यांच्या घड्याळ्यावर एक उमेदवार विजयी झाला, तोही पुर्वीचा कट्टर काँग्रेसवासी होता. पुर्वी त्यांनी चांगले काम केले, महापौरपदी असताना चांगल्या योजना राबविल्या तरी विजयासाठी झुंजावे लागले. हा विजय घड्याळाचा असला तरी ते स्वकर्तृत्वावर विजयी झाले आहेत. एकमेव अजित पवार यांच्या पक्षाचे विजयी झाले. यावरून आगामी लातूर जिल्ह्यात जिल्हापरिषदेच्या निवडणुकीच्या काळात ताकसुद्ध फुकून पिण्याची गरज आहे. वास्तविक भाजपाला चांगले यश मिळत आहे, याचा अर्थ भाजपाला जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत जपून पावले टाकावी लागणार आहेत. मतदार हा सतत पर्याय शोधत असतो. काँग्रेसला पर्याय हा भाजपा लाभला तसे जिल्हापरिषदेत झाले तर निकाल आश्‍चर्यकारक लागतील. राज्यातील नुकत्याच जो निकाल लागला यावरून जनतेच्यामनात काय आहे हे दिसून येते. मुंबई सारख्या शहरात ठाकरे परिवारास जनतेनी नाकारले किती वाईट बाब आहे. ज्या ठाकरे परिवाराने मुंबई मराठी माणसासाठी संरक्षित केली. त्याच ठाकरे बंधुना नाकारले याचा अर्थ मतदार हा हुशार व विचारी आहे हे सहज लक्षात येते. मुंबई काय राज्यातील निकालावरून बरेच गणित सोडविता येवू शकतात. काँग्रेस सह, अजित पवार यांनाही विचार करावा लागणार आहे. जरी अजित पवार किंवा शरद पवार एकत्र आले तरी यश मिळेलच याची खात्री नाही. निवडणुकीच्या तोंडावर ठाकरे बंधू एकत्र आले तसेच जिल्हापरिषदेच्या तोंडावर पवार काका-पुतणे एकत्र येणे म्हणजे यश मिळेल असे नाही. मुळात दोघे एकत्र आले म्हणजे राष्ट्रवादीला मतदार स्विकारतील असे नाही. लातूरसारख्या शहरात राष्ट्रवादीला स्विकारले नाही तर ग्रामीण भागत कसे स्विकारतील? त्यामुळे निवडणुकीच्या तोंडावर एकत्र येणे म्हणजे उलट मिळत असणारे यशावर प्रश्‍नचिन्ह आहे. त्यामुळे सध्याला ग्रामीण भागातील जनता भाजपाशिवाय इतरांचा विचार करतील असे दिसून येत नाही. शरद पवार यांच्या पक्षाला पुण्यात तीन व ठाण्यात चार नगरसेवक निवडूण आले आहे. अख्या महाराष्ट्रात मोठे अपयश आले. एकतर स्वत:च्या पक्षाला अपयश आले तर दुसरे काँग्रेसपेक्षा उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे नुकसान पवार यांच्यामुळे झाले आहे. उबाठा सेनेला हिंदुत्वाला लगाम लागला आहे. पुर्वी जे घडले ते शरद पावार यांच्या घडले असा जनतेचा कयास आहे. आता राष्ट्रवादीला विचार करून जिल्हापरिषदेत उडी घेणे उचित ठरणारे आहे. मुळात केंद्रात व राज्यात ज्या पक्षाची सत्ता असते त्यांचीच सत्ता स्थानिक स्वराज्य संस्थेत सत्ता आली किंवा असते त्या स्थानिक स्वराज्य संस्थला निधीची कमतरता भासत नाही. हे सर्वांना माहिती आहे व उघड आहे. याला प्रमाण देण्याची गरज नाही. आज देशात जी स्थिती आहे. काँग्रेस, राष्ट्रवादी अजित पवार व शरद पवार, त्याच प्रमाणे ठाकरे बंधु पेक्षा ओवेसीची स्थिती चांगली दिसून येते. त्यांच्या एमआयएमने बाजी मारली आहे. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे आहे. अल्पावधित भरारी घेतली आहे. किती योग्य किंवा अयोग्य हा विचार लोकशाहीत होत नाही. ओवेसी यांची ताकद महाराष्ट्रात वाढली आहे. आगामी काळात जिल्हा परिषदेत शिरकाव होवू शकतो. त्यामुळे काँग्रेस बरोबर पवार काका-पुतण्यांनी विचार केला पाहिजे. लातूर जिल्ह्यातील औसा येथील नगरपरिषदेत अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला यश मिळाले. ते केवळ बाबामुळे आले आहे. त्यांनी सत्ता असो किंवा नसो औसा शहरात विकासाची कामे केली आहेत. उन्हाळ्यात पाणी, संकट काळात जीवनावश्यक वस्तूचे किंट पोते पुरविले आहेत. त्यामुळे बाबा यांना यश मिळाले. तसे आगामी काळात भाजपासोडून सर्वांनी विचार करावा असे वाटत असेल तर जनतेसोबत राहुन जनतेची कामे केल्याशिवाय जनता मतदार स्विकारणार नाही हे नक्की!

# संपन्न अशी पंजाबी भाषा.....




शिख धर्मियांचे ९ वे गुरू ज्यांना हिंद दि चादर म्हणून ओळखले जाते ते श्री गुरू तेग बहादूर साहिब यांचा ३५० वा शहिदी समागम नांदेड येथे २४ व २५ जानेवारी, २०२६ या कालावधीत होत आहे. या निमित्ताने या धर्माबाबत अल्प स्वरूपात माहिती आपणास असली पाहिजे.

गुरू-शिष्य यांची परंपरा असलेल्या या मानवतावादी धर्मात शिष्य हा महत्वाचा या अर्थाने संस्कृत भाषेतून घेतलेला हा शब्द म्हणजे शीख ( शिष्य ) होय. पंजाब प्रांतात पंजाबी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. ही भाषा ज्या लिपीत आहे ती लिपी म्हणजे गुरूमुखी होय. तर पाकिस्तान विभाजनानंतर पकिस्तानात गेलेल्या पंजाब प्रांतात याच बोलीसाठी शाहमुखी लिपी वापरली जाते.

भाषिक वैशिष्ट्य बघताना ही लिपी इंडो-आर्यन आहे. पंजाबी गुरूंनी स्वीकारलेली व ज्या भाषेत रचना केल्या गेल्या व ज्यात श्री गुरू ग्रंथ साहिब आहे ती गुरूमुखी लिपी ११ ते १२ व्या शतकात प्राकृत भाषेपासून आजपर्यंत आली आहे. पाकिस्तानातील पंजाब प्रांतात वापरला जाणाऱ्या शाहमुखी लिपीवर लगतच्या पारशी (पर्शियन) आणि अरबी शब्दांचा प्रभाव अधिक आहेत. जगभरात असलेल्या साधारण २ कोटीहून अधिक पंजाबी भाषकांची भाषा मुळ पंजाबी हीच आहे.

देशात पंजाब राज्याची प्रमुख अशी असणाऱ्या पंजाबी भाषेला लगतच्या हरयाणा आणि दिल्ली राज्यातही अधिकृत भाषा म्हणून ओळख मिळालेली जगात कॅनडा, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदी देशात पंजाबी भाषकांची संख्या अधिक आहे.

पाकिस्तानात असलेल्या पंजाब प्रांतात देखील पंजाबी ही सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पंजाबमध्ये भाषिक महत्व लक्षात घेऊन भाषेच्या नावाने असणारे पंजाब विद्यापीठ आहे. याची स्थापना ३० एप्रिल, १९६९ रोजी पतियाला येथे करण्यात आली. या ठिकाणी पंजाबी भाषा संशोधन व तंत्रज्ञान शाखा आहे. या केंद्रातर्फे ऑनलाईन पंजाबी भाषेचा वापर तसेच सॉफ्टवेअर निर्मितीचे काम सातत्याने सुरू आहे. याचा माध्यमातून पंजाबी सायबर कमिटीला व सायबर क्षेत्रातील प्रत्येकाला मदत होत आहे.

पंजाबी भाषेबाबतचा विश्वकोष अर्थात तयार करण्यात आला असून हा ऑनलाईन विश्वकोष पतियाला येथील विद्यापीठाने २०१४ साली पंजाबीपिडीया () उपलब्ध करून दिला आहे. १९५४ साली पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली असून याला पंजाब राज्य शासन भाषक प्रस्तावासाठी मदत करीत आहे. पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी १९५५ पासून सुरू करण्यात आला आहे. ज्ञानपीठ नंतर दुसऱ्या क्रमांकाचा हा पुरस्कार मानला जातो. या खेरीज कॅनडा-भारत शिक्षण संस्थेतर्फे प्रतिवर्षी ढाहान पुरस्कार देखील दिला जातो.

पंजाब आणि महाराष्ट्र यांना जोडणारा महत्वाचा दुवा संत नामदेवांच्या रचना आहेत. त्यांच्या रचना शिख धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. याच निमित्ताने २०१५ साली संत नामदेवांची पंजाबातील कर्मभूमी असलेल्या घुमान येथे ८८ वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेण्यात आले होते.

संवाद हा भाषेतूनच पुढे जातो. त्याच संवादाचा सेतू नांदेड नगरीत हिंद-दि-चादर श्री. गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमातून होणार आहे. भक्ती हा मार्ग आणि त्याचसाठी भाषा हे साधन याची प्रतिती या काळात नक्की येईल.

**(संदर्भ : पंजाब विद्यापीठ व विकिपिडीया)**

**– प्रशांत दैठणकर**

# गुरु तेग बहादूर आणि संत नामदेव: मूलभूत विचारांची समानता

''हिंद दी चादर'' नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम राबविण्यात येत असून, भारतीय सांस्कृतिक आणि आध्यात्मिक परंपरा ही विविध संत, गुरू आणि विचारवंतांच्या योगदानातून समृद्ध झालेली आहे. या परंपरेत महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायाचे अग्रणी संत नामदेव महाराज (इ.स. १२७०१३५०) आणि शीख धर्माचे नववे गुरु, श्री गुरु तेग बहादूर साहिब (इ.स. १६२११६७५) हे दोन युगपुरुष वेगवेगळ्या काळात जन्मले. या दोघांमध्ये सुमारे तीन शतकांचे कालांतर असले, तरी त्यांच्या जीवनकार्याचा आणि तत्त्वज्ञानाचा अभ्यास केल्यास मूलभूत विचारधारेत लक्षणीय समानता आढळून येते. ही समानता अधोरेखित करण्याच्या दृष्टीने नांदेड येथे आयोजित करण्यात येणारा ''हिंद दी चादर'' हा विशेष उपक्रम महत्त्वपूर्ण ठरतो.




संत परंपरेचा समान मूल्याधिष्ठान संत नामदेव महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून भक्ती, सत्य, साधेपणा आणि मानवी समता यांचा पुरस्कार केला. त्यांनी जात, वर्ण आणि कर्मकांडांवर आधारित भेदभावाला ठाम विरोध केला. ''ईश्वर सर्वत्र आहे'' ही भावना त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू होती.

त्याचप्रमाणे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनीही ईश्वर एक असून तो सर्व मानवांचा आहे, असा सार्वत्रिक दृष्टिकोन मांडला. त्यांनी धार्मिक असहिष्णुता, अन्याय आणि जबरदस्तीविरुद्ध उभे राहून मानवमूल्यांचे संरक्षण केले.

निर्भयता, सत्यनिष्ठा आणि बलिदान संत नामदेव महाराजांनी सामाजिक अन्यायाविरोधात निर्भयपणे आवाज उठविला. सत्य आणि नामस्मरण हाच खरा धर्म असल्याचे त्यांनी आपल्या रचनांमधून स्पष्ट केले.

श्री गुरु तेग बहादूर साहिब यांनी सत्य, धर्मस्वातंत्र्य आणि मानवी स्वाभिमान यांसाठी सर्वोच्च बलिदान दिले. त्यांनी स्वतःच्या धर्मापुरते मर्यादित न राहता इतर धर्मीयांच्या हक्कांसाठी प्राणांची आहुती दिली. त्यामुळे त्यांना ''हिंद दी चादर'' म्हणून गौरविण्यात येते.

मानवी स्वातंत्र्य आणि आत्मसन्मान संत नामदेवांनी माणसाच्या अंतःकरणातील शुद्धता आणि आत्मसन्मान यांना सर्वोच्च स्थान दिले. बाह्य आडंबरांपेक्षा अंतर्गत भक्ती व नैतिकता महत्त्वाची असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

गुरु तेग बहादूर साहिब यांनी व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषतः धार्मिक स्वातंत्र्य, हा मानवी जीवनाचा मूलभूत अधिकार असल्याचा संदेश आपल्या आचरणातून दिला.

''हिंद दी चादर'' उपक्रमाचे महत्त्व

नांदेड येथे श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समागमानिमित्त आयोजित करण्यात येणारा ''हिंद दी चादर'' हा विशेष उपक्रम केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सामाजिक सलोखा, राष्ट्रीय एकात्मता आणि सर्वधर्मसमभाव यांचा संदेश देणारा आहे.

या उपक्रमाच्या माध्यमातून गुरु तेग बहादूर साहिब यांच्या त्याग, बलिदान व मानवतावादी विचारांचा प्रसार करण्यात येत असून, त्याचबरोबर महाराष्ट्राच्या संत परंपरेतील संत नामदेव महाराजांच्या विचारांशी असलेली वैचारिक समानता अधोरेखित करण्यात येत आहे.

सामाजिक सलोखा व राष्ट्रीय एकात्मता

संत नामदेव महाराज आणि गुरु तेग बहादूर साहिब यांच्या विचारधारेमुळे समाजात सहिष्णुता, बंधुता आणि समतेची भावना दृढ झाली. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीतही मार्गदर्शक ठरतात.

''हिंद दी चादर'' या उपक्रमातून विविध धर्म, पंथ आणि समाजघटकांमध्ये परस्पर सन्मान व समन्वयाची भावना वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे.

संत नामदेव महाराज आणि श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्यात जरी तीन शतकांचे कालांतर असले, तरी सत्य, निर्भयता, मानवी स्वातंत्र्य, सामाजिक समता आणि ईश्वरभक्तीची सार्वत्रिक भावना ही दोघांच्या विचारधारेची समान सूत्रे आहेत. नांदेड येथे आयोजित ''हिंद दी चादर'' श्री गुरु तेग बहादूर साहिब यांच्या ३५० व्या शहीदी समागमानिमित्त विशेष उपक्रम हा या महान परंपरेचे स्मरण करून देणारा व भावी पिढीसाठी प्रेरणादायी ठरणारा उपक्रम आहे.

**– प्रभाकर बारहाते,**
**प्र. जिल्हा माहिती अधिकारी, हिंगोली**

# धर्माची शिकवण आणि आपत्तीत मदतीचा हात...!





शिख धर्मियांचा एक मोठा उपक्रम साजरा करताना या धर्माने विविध क्षेत्रात दिलेले योगदान आपण बघितले पाहिजे. त्यात सेवा आणि निस्वार्थ सेवा याकडे आपण लक्ष द्यायलाच हवे. पूर असो वा भूकंप किंवा इतर कोणतीही नैसर्गिक आपत्ती यात निःस्वार्थ सेवा या समुदायाकडून दिल्ली जाते. गरजूंना (सामुदायिक स्वयंपाकघर) अर्थात लंगरच्या माध्यमातून अन्न व निवारा देण्यासोबतच आपत्तीतून सुटका करणे व आवश्यक ते मदत कार्य करणे यासाठी शीख स्वयंसेवक योगदान देतात.

सेवा भाव अर्थात सेवा करवाना धर्म-पंथ याचा भेद न पाळता सर्वांना माणुसकीच्या नात्याने शक्यतोपरी मदतीचा हात स्वयंसेवक देताना जगभरात आपणास दिसतील.

गुरुद्वारांमध्ये २४ तास अखंड सेवा,मदतीचा एक भाग बनते त्यावेळी गरजूंना अन्न पुरवण्याचा मोठा स्रोत समाजासाठी खुला होतो.

जगभरात खालसा एड च्या माध्यमातून आपत्तीच्या काळात मदत पुरवली जाते. यात शीख स्वयंसेवक जगभरात सर्व भौगोलिक सिमांच्या पलिकडे जाऊन मदत करतात.

आपत्ती काळात जी विविध कामे होतात त्यात भोजन व पिण्याचे पाणी पुरविणे, तात्पुरत्या निवाऱ्याची व्यवस्था करणे व बचाव कार्यात सहभाग अशी विभागणी आपणास दिसते. यात सर्वाधिक मोलाचे कार्य म्हणजे आपत्तीच्या काळात पिडितांना भावनिक आधार देणे होय. आपत्तीत आप्त स्वकियांना गमावलेल्यांना मोठा मानसिक धक्का बसलेला असतो अशा सर्वांना भावनिक आधार देणे महत्वाचे असते हे काम स्वयंसेवक करतात.

शीख धर्मावर आणि धर्मतत्वांवर आधारित अशी आंतरराष्ट्रीय स्वयंसेवी संस्था म्हणून खालसा एडची जगभरात ओळख आहे. केवळ धार्मिक शिकवण न राहता आपत्तीच्या काळात मदतीचा हात पुढे करणारी एक महत्वाची ताकद म्हणून या स्वयंसेवी संस्थेला ओळख मिळाली आहे.

याच स्वरुपाचे आपत्तीकाळात काम करणारी आणखी एक स्वयंसेवी संस्था म्हणजे युनायटेड शिख होय. या संस्थेने २०२५ मध्ये पंजाब मध्ये आलेल्या महापूरातून लोकांना सावरण्यास खूप मोठी मदत केली .या भूतो-न-भविष्यती महापूरामध्ये पंजाबात अतोनात नुकसान झाले. गावेच्या गावे यात बुडाली. अनेकजण विस्थापित झाले. घरे आणि शेती याचेही या पुरात मोठे नुकसान झाले.

या काळात २००० हून अधिक जणांची पुरातून सुखरूप सुटका करण्यासोबतच ८ हजाराहून अधिक नागरिकांना वैद्यकीय उपचार तसेच तात्पुरता निवारा, अन्न, पिण्याचे शुद्ध पाणी , वस्त्रे आणि गरजेचा शिधा पुरविण्यात या संस्थेने पुढाकार घेतला . या पुरात ८७ हून अधिक गावात पूर्णतः नुकसान झाले. यातील अनेकांना आर्थिक मदतीची गरज लागणार आहे यासाठी, एक लक्ष डॉलरचा निधी उभारण्याचे काम ही संस्था करीत आहे.

नैसर्गिक आपत्ती कोणत्या स्वरुपात समोर येईल हे सांगता येत नाही. या काळात मानवता वादी दृष्टीकोण आणि निःस्वार्थ सेवा याचा वस्तुपाठ शीख बांधवांनी जगासमोर सादर केलाय असं म्हणता येईल.

**प्रशांत दैठणकर /९८२३१९९४६६**

**संकलन आभार – गुरमीत कौर आणि खालसा एड**

## पावसाळ्यात सुरुवात करा हर्बल टी प्यायला, राहाल आजारांपासून दूर

पावसाळा हा अनेक आव्हाने घेऊन येतो. अर्थात पावसामुळे या हंगामात उष्णतेपासून दिलासा मिळत असला, तरी या काळात आजारांचा धोका असतो. देशाच्या काही भागात पावसाचे आगमन झाले आहे. कडक उन्हापासून संरक्षणाच्या या ऋतूमध्ये आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे, जेणेकरून कोणत्याही प्रकारचे संसर्ग टाळता येईल.

कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना या ऋतूमध्ये सर्वाधिक समस्यांचा सामना करावा लागतो. असे लोक पावसाळ्यात होणाऱ्या संसर्गास लवकर बळी पडतात. पावसाळ्यात होणारे आजार टाळण्यासाठी प्रतिकारशक्ती वाढवण्याची गरज आहे. यासाठी तुम्ही हर्बल टी पिऊ शकता. चला जाणून घेऊया आरोग्यासाठी कोणते हर्बल टी फायदेशीर आहेत.

**पेपरमिंट चहा**

पावसाळ्यात पेपरमिंट चहा पिणे खूप फायदेशीर ठरू शकते. ताजेपणा देण्यासोबतच तुम्हाला अनेक फायदेही मिळतील. हा चहा प्यायल्याने पचनक्रिया सुधारते. याशिवाय रोगप्रतिकारक शक्ती देखील वाढवते. पेपरमिंट चहा देखील श्वास ताजे करतो.

**आल्याचा चहा**

आल्याचा चहा ही अनेकांची पहिली पसंती असते. काही लोकांची सकाळ या चहाने सुरू होते. औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असलेला हा चहा प्यायल्याने पचनक्रिया सुधारते आणि ॲलर्जीही दूर होते.

**कॅमोमाइल चहा**

पावसाळ्यात तुमची प्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी कॅमोमाइल चहा पिणे खूप फायदेशीर आहे. तणाव दूर करण्यासाठी आणि चांगली झोप घेण्यासाठी देखील हे उपयुक्त आहे. यासोबतच हे पचनसंस्थेसाठीही खूप फायदेशीर मानले जाते.

**ग्रीन टी**

वजन कमी करण्यासाठी लोक सहसा ग्रीन टी पितात. पण अँटीऑक्सिडंटने भरलेला हा चहा प्यायल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होते. यामुळे आपले शरीरही डिटॉक्स होते. हे रोगांशी प्रभावीपणे लढण्यास मदत करते.

## युरिक ॲसिड नियंत्रित करण्यासाठी सकाळी रिकाम्या पोटी प्या 'हे' ड्रिंक, मिळेल आराम



आजच्या धावपळीच्या जगात, युरिक ॲसिडची समस्या सामान्य होत आहे. युरिक ॲसिडचे वेळेवर नियंत्रण ठेवले नाही तर त्यामुळे गाउट, सांध्यांची सूज आणि किडनीच्या समस्या उद्भवू शकतात. युरिक ॲसिडची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी योग्य जीवनशैली आणि आहार आवश्यक आहे.

युरिक ॲसिडची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी आहारात काही बदल करण्याची गरज असते. तुमच्या शरीरात युरिक ॲसिडची पातळी वाढली असेल तर सकाळी रिकाम्या पोटी काय खावे किंवा प्यावे जेणेकरून युरिक ॲसिडची पातळी नैसर्गिकरित्या कमी करता येईल याबाबत आज आपण जाणून घेऊया..

**तुळशीचे पाणी–**

तुळशीमध्ये अँटी इन्फ्लीमेंट्री गुणधर्म असतात. तुळशीची काही पाने रात्रभर पाण्यात भिजवून ठेवा, गाळून घ्या आणि सकाळी रिकाम्या पोटी प्या. हे पाणी शरीराला विषारी पदार्थांपासून मुक्त करते आणि जळजळ कमी करते.

**कोमट लिंबू पाणी–**

लिंबूमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. जे युरिक ॲसिड विरघळवून ते लघवीद्वारे बाहेर काढण्यास मदत करते. रिकाम्या पोटी एक ग्लास कोमट पाण्यात अर्धा लिंबू पिळून प्या. हे शरीराला क्षारयुक्त करते आणि ॲसिडीटी कमी करते.

**आवळा रस–**

आवळा हा व्हिटॅमिन सीचा समृद्ध स्रोत आहे. जो शरीरात युरिक ॲसिड जमा होऊ देत नाही. दररोज सकाळी एक ग्लास ताज्या आवळ्याचा रस प्यायल्याने पचन सुधारते आणि सांध्यांच्या जळजळीपासून आराम मिळतो.

**ॲपल सायडर व्हिनेगर**

ॲपल सायडर व्हिनेगर शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. एक ग्लास कोमट पाण्यात एक चमचा ऑरगॅनिक ॲपल सायडर व्हिनेगर मिसळा आणि रिकाम्या पोटी प्या. यामुळे युरिक ॲसिडची पातळी नियंत्रणात राहते.

## हिवाळ्यातही शरीरातील पाणी कमी झालेय? हायड्रेटेड राहण्यासाठी करा 'हे' उपाय

जेव्हा शरीरातील पाणी कमी होते तेव्हा ते डिहायड्रेट होते. शरीरातील पाण्याचे प्रमाण गरजेपेक्षा कमी असल्याने डिहायड्रेशनची लक्षणे दिसतात. जर तुम्हाला डिहायड्रेशनची लक्षणे जाणवत असतील तर डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि हायड्रेटेड कसे राहायचे त्याच्याकडे लक्ष द्या.

हिवाळ्यात अनेकदा तहान कमी लागते त्यामुळे आपण आपसूकच पाणी कमी पितो.ज्यामुळे शरीरातील पाणी कमी होण्याची शक्यता असते. त्यामुळेच आज आपण थंडीत हायड्रेटेड राहण्याचे काही सोपे उपाय जाणून घेऊया..

**दही–**

तुम्ही तुमच्या शरीरातील पाण्याचे प्रमाण वाढवण्यासाठी दह्याचे सेवन देखील करू शकता. दह्यामध्ये इलेक्ट्रोलाइट्स भरपूर असतात. तुम्ही दिवसातून दोनदा एक कप दही खावे. दह्याचे सेवन केल्याने डिहायड्रेशन टाळता येईल.

**फळे आणि भाज्या–**

शरीरात हायड्रेशन ठेवण्यासाठी, तुम्ही पाण्याव्यतिरिक्त भाज्या आणि फळे खाऊ शकता. दिवसातून दोनदा फळे आणि भाज्या खाल्ल्याने डिहायड्रेशन कमी होण्यास मदत होईल. तुम्हाला आवडत असल्यास तुम्ही सॅलड देखील खाऊ शकता. या पदार्थांमधून पुरेसे पाणी तुमच्या शरीरात जाते.

**तुळशीचा रस–**

जर तुम्हाला डिहायड्रेटेड वाटत असेल तर तुम्ही तुळशीच्या पानांचा रस देखील पिऊ शकता. तुळशीच्या पानांचा रस काढून तो एक कप पाण्यात घाला आणि दिवसातून दोनदा प्या.

**उसाचा रस–**

उसाचा रस डिहायड्रेशन कमी करण्यास मदत करू शकतो. तुम्हाला हिवाळ्यात पाणी जात नसेल तर दिवसात एक-दोनदा तहान भागवण्यासाठी आणि शरीराला हायड्रेट करण्यासाठी तुम्ही उसाचे रस आनंदाने पिऊ शकता.

बडीशेप पाणी- डिहायड्रेशन टाळण्यासाठी, तुम्ही बडीशेपचे पाणी देखील पिऊ शकता. एका लिटर पाण्यात बडीशेप उकळा आणि हे पाणी दिवसभर तहान लागल्यास प्या.

# महायुती ठरली सरस

भावनिक आवाहनापेक्षा मतदार विकासाला आणि सरकारी योजनांना अधिक प्राधान्य देतात हेही निकालातून स्पष्ट झाले. शिंदे यांनी शिवसेनेतून फुटून स्वतःला बाळासाहेब ठाकरे यांच्या विचाराचे वारसदार म्हणून घोषित केल्याने एकत्रित शिवसेनेची ताकद विभागली गेली.
राज्यातील २९ महापालिकांपैकी २३ महापालिकांत भाजपने वर्चस्व प्रस्थापित केले आहे. पुणे, पिंपरी-चिंचवड, ठाणे, नागपूर, संभाजीनगर, नाशिक, नवी मुंबई, कल्याण डोंबिवली, सांगली, सोलापूर, धुळे, अहिल्यानगरमध्ये भाजपच प्रथम क्रमांकावर राहिला आहे. २ हजार ८६९ नगरसेवकांपैकी निम्म्याहून अधिक नगरसेवक भाजपचे आहेत. ठाकरे बंधूंची युती, अजित पवार, शरद पवारांची राष्ट्रवादी यांना पराभवाचा सामना करावा लागला. अजित



पवारांनी ऐन निवडणुकीत भाजपची साथ सोडून शरद पवारांशी हातमिळवणी केली. भाजपवर भ्रष्टाचाराचे आरोपही केले; पण मतदारांना ते भावले नाहीत. पुणे-पिंपरीवर वर्चस्व राखण्याचे पवार कुटुंबाचे स्वप्न भंग पावले आहे. सर्वार्थाने बहुचर्चित ठरलेली मुंबई महापालिका भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेने काबीज केली. महायुती म्हणून लढलेल्या या दोन्ही पक्षांनी मिळून तेथे बहुमताचा आकडा गाठला आहे. सर्वच राजकीय पक्षांनी सगळी शक्ती पणाला लावून ही निवडणूक लढली. कोल्हापूर, चंद्रपूर आणि सांगली आदि ४ महापालिकांत काँग्रेसने चांगले यश मिळवले आहे. निवडणुकीत वातावरण निर्मितीत भाजप आघाडीवर होताच, भाजपच्या आक्रमक प्रचारशैलीपुढे विरोधक निष्प्रभ ठरले. ऐन निवडणुकीच्या तोंडावर विरोधी पक्षातील मातब्बरांना फोडून आपल्या पक्षात घेणे आणि त्यांनाच उमेदवारी देणे ही भाजपची कार्यशैली हे या निवडणूक निकालामागचे सूत्र ठरले आहे. सगळ्या निवडणूक तंत्राचा वापर करून भाजपने मुंबईत ठाकरे बंधूंची कोंडी केली होती. खरे तर ठाकरे बंधूंसाठी ही त्यांच्या अस्तित्वाची लढाई होती. गेल्या वीस वर्षांतील वैर विसरून राज आणि उद्धव हे दोघे ठाकरे बंधू एकत्र आले; मात्र ठाकरे यांच्या शिवसेनेला गेल्या वेळच्या निवडणुकीत मिळाल्या तेवढ्याही जागा टिकवता आल्या नाहीत.**ठाकरे ब्रँडचे काय?**

महापालिका निवडणुकांचा कल आणि निकाल लक्षात घेता महाराष्ट्र राजकीय पटलावर मोठे फेरबदल दिसून येत आहेत. प्रामुख्याने मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, ठाणे, नाशिक यांसारख्या महत्त्वाच्या महापालिकेचा कल सत्ताधारी महायुतीच्या बाजूने झुकल्याचे दिसून येते. मुंबई महापालिकेत भाजप आणि शिंदे यांच्या शिवसेनेच्या महायुतीने ठाकरे बंधूंसमोर मोठे आव्हान निर्माण केले. गेली पंचवीस वर्षे ही महापालिका ठाकरे यांच्या अधिपत्याखाली होती, त्यालाच महायुतीने आता सुरूंग लावला आहे. महाविकास आघाडी म्हणून काँग्रेस आणि ठाकरे यांच्या शिवसेनेने ही निवडणूक एकत्रित लढली असती, तर कदाचित वेगळे चित्र पाहायला मिळाले असते. काही विशिष्ट प्रभागात काँग्रेसने विजय मिळवला असला तरी राज्याच्या पातळीवर काँग्रेसची कामगिरी निराशाजनक ठरली आहे. उत्तर महाराष्ट्रात नाशिक, जळगावमध्ये स्थानिक नेत्यांचा प्रभाव असल्याचे स्पष्ट झाले.
विदर्भ नागपूरमध्ये भाजपने आपले वर्चस्व कायम राखले आहे. महायुतीने निवडणुकीसाठी केलेले सूक्ष्म नियोजन, मुख्यमंत्र्यांनी केलेले झंझावाती प्रचारदौरे, मुलाखती यामुळे भाजपचा विजय झाला असे म्हणावे लागेल. भाजपची संघटनात्मक बांधणीही या यशाचे कारण ठरले आहे. त्याचाही फटका ठाकरे बंधूंना बसला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, त्यांचे मंत्री यांनी राज्यभर प्रचाराचे रान उठवले. या उलट उद्धव आणि राज ठाकरे यांनी केवळ मुंबई महापालिकेपुरते लक्ष केंद्रित केले होते. भाजपच्या निरंकुश यशातून विरोधी पक्षाची भूमिका कमकुवत होत आहे. त्याचा परिणाम लोकशाही प्रक्रियेवर होत आहे. विरोधी पक्षाची विश्वासार्हता कमी होत आहे का? असा प्रश्न त्यातून पडतो. जनतेच्या प्रश्नावर ठाम भूमिका विरोधक घेत नाहीत. त्याचा फायदा भाजपच उठवत आहे. भाजपवर टीकेपेक्षा पर्यायी कार्यक्रम आणि धोरणे मतदारांसमोर ठेवणे हे विरोधकांसमोर मोठे आव्हान आहे.



## केसांसाठी कांद्याच्या रसाचे बरेच फायदे

कांदा हा आपल्या आहाराचा महत्त्वाचा भाग मानला जातो. भाजीची चव वाढवायची असो किंवा अप्रतिम फोडणी द्यायची असो. कांद्याशिवाय काहीही शक्य नाही! हे अन्नासोबत कच्चेही खाल्ले जाते, जसे की सॅलड. पण कांद्याची ही खासियत फक्त जेवणाची चव वाढवण्यापुरतीच मर्यादित नाही तर सौंदर्याबद्दल बोलायचे तर त्या दृष्टीनेही कांद्याचे अनेक फायदे आहेत. कांद्याचा रस केस आणि त्वचेसाठी खूप उपयुक्त आहे, कांदे खाल्ल्याने आरोग्य चांगले राहते. तर कांद्याचा रस आपल्या केसांसाठी आणि त्वचेसाठी खूप फायदेशीर आहे. कांद्याचे इतरही अनेक फायदे आहेत. चला तर मग जाणून घेऊया कांदा आपल्या सौंदर्यात कसा भर घालतो.

केसांसाठी कांद्याच्या रसाचे फायदे (इशपशषळींी जष जपळेप गींळलश ॠी क्ष्ळी)

आजकाल जवळजवळ प्रत्येकाला केस गळण्याची समस्या असते. तरुणांनाही टक्कल पडणे आणि केस अकाली पांढरे होण्याची समस्या असते. मात्र, चांगला आहार न घेणे, केसांची योग्य काळजी न घेणे आणि प्रदूषित वातावरण हे यामागचे एक कारण आहे. पण, या सर्व समस्यांवर कांद्याच्या रसाचा वापर प्रभावी ठरतो. चला जाणून घेऊया कांद्याच्या रसाचे काय फायदे आहेत.

केसांच्या वाढीसाठी कांद्याचा रस
कांद्यामध्ये अँटी-बॅक्टेरियल, अँटी-फंगल आणि अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे आपल्या केसांची वाढ करतात. यामध्ये असलेले सल्फर केसांना जाड आणि चमकदार बनवते. केसांची लांबीही वाढते. कांद्याचा रस डोक्यातील रक्ताभिसरणही वाढवतो. यासोबतच हे टाळू मजबूत करते. त्यामुळे केस मजबूत होतात आणि त्यांची वाढही झपाट्याने होते.

कसे वापरावे?ऑलिव्ह ऑईलमध्ये कांद्याचा रस मिसळून केसांच्या मुळांना लावल्याने किंवा मसाज केल्याने केस लांब आणि मजबूत होतात.
अर्धा कप कांद्याच्या रसात दोन चमचे मध मिसळा

## तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! हे असू शकते आजाराचे लक्षण

**प्रज्ञा घोगळे-निकम**

तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! 'हे' असू शकते आजाराचे लक्षण जांभई या शब्दाचा नुसता उल्लेख तुम्हाला आळशीपणाने भरून टाकतो आणि तुम्हाला तुमचे हात लांब करून मोठी जांभई घ्यावीशी वाटते. तुमच्या लक्षात आले असेल, तर तुम्हाला कळेल की, माणसांनी खचाखच भरलेल्या खोलीत एकाने जांभई दिली तर जणू काही जांभईची मालिका सुरू होते.
पण, जांभई येणे हे देखील कंटाळवाणेपणाचे लक्षण आहे हे तुम्हाला माहीत आहे का? बहुतेक प्रकरणांमध्ये, जांभई झोपेची कमतरता किंवा थकवा दर्शवते.
हेही वाचा : ठशींीश्रशीी डशस डूपवीेः
तुम्हालाही पाय हलवण्याची अनियंत्रित इच्छा सतत होते आहे का? मग वाचा!
येथे आम्ही जांभई किंवा जांभईशी संबंधित काही तथ्य सांगत आहोत ज्याबद्दल तुम्हाला कदाचितच माहिती असेल.
१. आणि आपल्यालाही जांभई येते
तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! 'हे' असू शकते आजाराचे लक्षण
सरासरी, एक मानवी जांभई ६ सेकंदांची असते आणि त्यामुळे अनेकदा इतर लोकांना जांभई येते. तुम्ही जांभई देणार्या व्यक्तीला उलटे, बाजूला किंवा सरळ उभे असताना पाहत असलात तरी, आपल्या मेंदूला जांभई देणार्या व्यक्तीच्या स्थितीची किंवा स्थानाची पर्वा नसते. तुमच्या आजूबाजूला कोणीतरी जांभई देत आहे हे फक्त तुमच्या मेंदूला जांभई देण्यासाठी पुरेसे आहे.
२. जांभईशी लढू शकत नाही
तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! 'हे' असू शकते आजाराचे लक्षण



जांभई थांबवण्याचा कोणताही मार्ग नाही. आपण इच्छित असल्यास आपण प्रयत्न करू शकता! जेव्हा तुम्हाला जांभईची तीव्र इच्छा जाणवते तेव्हा दात बंद ठेवून सामान्यपणे श्वास घेण्याचा प्रयत्न करा. तुम्हाला जाणवेल की तुम्हाला अस्वस्थ वाटत आहे आणि तुम्ही ते जास्त काळ टिकवून ठेवू शकणार नाही. तुमचा चेहरा कृष्णविवरातून जात आहे असे तुम्हाला वाटेल. जांभईच्या प्रक्रियेचा एक भाग म्हणजे जबडा उघडणे. जांभई येईपर्यंत तुम्हाला आराम वाटत नाही.
शरीरासाठी व्हिटॅमिन डी महत्वाचे का आहे? त्याचे फायदे, कमतरतेची कारणे आणि नैसर्गिक स्रोत जाणून घ्या
३. हे सर्व एक रासायनिक प्रतिक्रिया आहे
तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! 'हे' असू शकते आजाराचे लक्षण
जरी आपल्यापैकी बहुतेकांचा असा विश्वास आहे की जेव्हा आपण झोपायला तयार असतो किंवा आपल्याला झोप येते तेव्हाच आपण जांभई देतो. पण सत्य हे आहे की जांभईतून तुमचे शरीर तुमच्या शरीरात काही रसायने सोडत आहे. जेव्हा तुम्ही जांभई देता तेव्हा तुमचा मेंदू आणि शरीर हार्मोन्स आणि डोपामाइन, नायट्रिक ऑक्साईड, सेरोटोनिन, एमिनो ॲसिड आणि ऑक्सिटोसिन यांसारखी रसायने सोडतात जे तणावाशी लढण्यास मदत करतात.४. जांभई येणे हे देखील एखाद्या रोगाचे लक्षण असू शकते
तुम्हालाही सतत जांभई येते? आताच व्हा सावध! 'हे' असू शकते आजाराचे लक्षण
जांभई येणे हे झोपेची कमतरता आणि थकवा येण्याचे लक्षण आहे.

**(क्रमशः उद्याच्या अंकात)**

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा

**हार्ट अटॅक कमी करतो सहवासचा धोका**

सहवास तुमच्या हृदयासाठीही फारच उपयोगी आहे. सहवास करत राहत असतांना हार्ट अटॅकचा धोका कमी होतो, नियमित सहवास हार्ट अटॅक आणि स्ट्रोकती शक्यता निम्याने कमी होते. सहवास करत राहिल्याने एस्ट्रोजन आणि टेस्टोस्टेरॉन संतुलित राहतं. जाणकारांच्या मते एका आठवड्यात दोन वेळा सहवास केल्याने हार्ट अटॅकची शक्यता निम्याने कमी होते.९) दुखणी गायब करतो सहवास हवास शरीराची अनेक दुखणी कमी करतो, सहवास एक्सपर्टच्या मते एस्पिरिनची गोळी घेण्यापेक्षा सहवास जास्त लाभदायक आहे. यामुळे शरीरारातील दुखणी कमी करण्यासाठी सहवास गोळ्यांपेक्षाही जास्त लाभदायक मानला जातो.

## २ Joke विनोद




प्रियकर प्रेयसी बागेत बोलत बसले होते. प्रेयसी म्हणाली, प्रेम, माझ्या मम्मीला ना तू खूप खूप आवडतोस.
प्रेम घाबरून म्हणाला. पण..पण मी लग्न तुझ्याशीच करणार हं.

## ३ Message संदेश




Arz he..
Hum bhi dost tere lie TAJ MAHAL banaaenge..
Gaur farmaaiga...
Hum bhi dost tere lie TAJ MAHAL banaaenge..
Ek cup shubah .. or ek cup shaam ko pilaenge.

## ४ Thought सुविचार



श्रद्धा ही सामर्थ्यवान असते. कशावर तरी श्रद्धा ठेवल्याशिवाय माणूस जिवंत राहू शकत नाही.

**संस्कृत सुभाषित**

**आयुः वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः।**
**रस्याः ास्निग्धाः ास्थिरा हृद्या आहाराः**
**साात्विंकप्रिया : ।।**

अर्थ - जो आहार आयुष्य, मनोबल, शक्ती, प्रेम, सुख यांचे संवर्धन करतो, तोच आहार साात्विक लोकांना प्रिय असतो.(हा स्निग्ध आणि रसमय आहार असतो.)

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. ब्लडप्रेशरला मराठी शब्द
४. आपला-परका असा भेद (भाव)
७. श्वापद, पशू
११. भ्रमंती
१३. डवरणे, भरून येणे
१४. फणसाचा एक प्रकार
१६. पादत्राण
१७. देशी दारू
१८. पूर्णपणे
१९. यांच्यासारखे सख्य म्हणजे पूर्ण वैरच की!
२२अ. पेशव्यांची राजधानी
२४. खंदक
२५. खुंटी, मेख
२६. सत्य
२९. आजूबाजूला
३०. सांघिक व्यायाम
३२. अनुमती
३४. घोडा
३५. स्वत:च्या नावे कालगणना सुरू करणारा राजा
३७. रोम
३९. कवी बा.भ. बोरकर यांची नादमधुर कविता- 'गडद निळे, गडद निळे --- भरूनि आले'
४१. गुडघ्याखाली येणारा हार
४४. दारूच्या आहारी गेलेला
४६. समाधान पावलेला
४७. दूध वा दूधाचे पदार्थ
४८. थडगे
५०. गुणज्ञ
५२. खवा
५३. बडबड्या
५५. माळ, हार
५७. देह
५९. मज्जाव
६०. पातळ खांब
६२. कपाळभर लावलेले कुंकू
६३. वागणूक
६४. वाईटाचे मंत्रतंत्र
६६. क्षमता, ताकद
६७. धमनी
६९. लक्ष्मी
७१. संताप
७३. बागवान
७४. बासरी
७६. गणपती
७७. किरकोळ सामान

### उभे शब्द

१. चैत्रवमीचा अवतार
२. मोठी जाड सुई
३. लट, परंतु (इंग्रजी)
४. आमिरचे बंबईय्या भाषेतील पर्यटनगीत!-'-- क्या खंडाला?
५. प्रचीती, अनुभव
६. बासुंदीपेक्षा हल्ली ही लोकप्रिय
७. स्त्रियांसाठी पूर्वी वापरले जाणारे विशेषण
८. धातूचे चलन
९. झाडाच्या चिकापासून मिळणारा चिवट पदार्थ
१०. अळूच्या भाजीत ही पालेभाजी हवीच!
१२. उबग, सुस्ती
१५. उपवासाचा कंद
१८. ही उपाधी मिरवण्यासाठी पुण्यात केवळ वास्तव्य असणे पुरेसे नाही!
१९. विकासपथावर असलेला
२०. नको त्या गोष्टीत नाक खुपसणारी
२१. कालच्या आधीचा दिवस
२२. 'स्वामी'कार रणजित देसाईंच्या पत्नी माधवी देसाई यांचे आत्मकथन- '-- गं घुमा'
२३. गाईचे पिल्लू
२५. पाप
२७. तमाशातील प्रश्नोत्तरे
२८. ही टाकणे म्हणजे पड
२९. ध्वनी
३१. यश देणारे
३३. आश्चर्य
३६. रवाळ
३८. सतत तक्रार करणारा
४०. करूणा, कीव
४१. अंगमेहनत करून निर्वाह करणारा
४२. घराणे,४३. हस्त
४५. तात्पुरते रुसणे
४७. पणजीचे राज्य
४८. वेदनेची तिडीक
४९. जीभ, ५१. दार
५२. आत्या,५४. एक पालेभाजी
५६. श्रीमंत,५७. मंदवासर
५८. छोटा फोड, ५९. चितन
६१. उंट हाकणारा, ६२. मनाला आलेला थकवा,६५. भडीमार,६८. समतल
७०. तपास, शोध,७२. फक्त, केवळ
७३. चंद्राची कड
७५. घाव, प्रहार

### आडवे उत्तरे

१.रक्तदाब ४.आपपर ७.अनावर ११.भटकंती १३.डबडबणे १४.बरका १६.वहाण १७.ताडी १८.पुरता १९.विळाभोपळा २२अ.पुणे २४.चर २५.पाचर २६.कस २९.आसपास ३०.कवायत ३२.परवानगी ३४.वारू ३५.शककर्ता ३७.लव ३९.जलद ४१.कमालखानीहार ४४.दारूड्या ४६.तुष्ट ४७.गोरस ४८.कबर ५०.कदरदान ५२.मावा ५३.वाचाळ ५५.सर ५७.शरीर ५९.मनाई ६०.वासा ६२.मळवट ६३.वर्तन ६४.जारणमारण ६६.कुवत ६७.नस ६९.रमा ७१.राग ७२.माळी ७४.पावा ७६.गजानन ७७.सटरफटर

### उभे उत्तरे

१.रघुवर २.दाभण ३.बट ४.माती ५.पडताळा ६.रबडी ७.अबला ८.नाणे ९.रबर १०.चुका १२.कंटाळा १५.रताळे १८.पुणेकर १९.विकसनशील २०.भोचकभवानी २१.परवा २२.नाच २३.वासरु २५.पातक २७.सवालजबाब २८.नांगी २९.आवाज ३१.यशस्कर ३३.नवल ३६.कणीदार ३८.रड्या ४०.दया ४१.कष्टकरी ४२.खानदान ४३.हात ४५.रुसवा ४७.गोवा ४८.कळ ४९.रसना ५१.दरवाजा ५२.मावळण ५४.चाकवत ५६.रईस ५७.शनिवार ५८.पुटकुळी ५९.मनन ६१.सारवान ६२.मरगळ ६५.मारा ६८.सपाट ७०.माग ७२.मात्र ७३.कोर ७५.वार



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### विराट कोहली आणि रोहित शर्मा आता पुढचा आंतरराष्ट्रीय सामना कधी खेळतील?



मुंबई-भारत आणि न्यूझीलंड क्रिकेट संघांमध्ये वनडे मालिका झाल्यानंतर आता टी-२० मालिका होणार आहे. विराट कोहली आणि रोहित शर्मा यांच्यासाठी ही मालिका संपली आहे ही वेगळी बाब आहे. ते फक्त वनडे मालिका खेळत आहेत, त्यामुळं ते आता विश्रांती घेतील. दरम्यान, टी-२० मालिका सुरू होईल, पण ते खेळताना दिसणार नाहीत.भारत विरुद्ध इंग्लंड वनडे मालिकेचे वेळापत्रक : वनडे मालिकेचा पहिला सामना १४ जुलै रोजी खेळला जाईल, मालिकेचा तिसरा आणि शेवटचा सामना १९ जुलै रोजी खेळला जाईल. या मालिकेसाठी बराच वेळ शिल्लक आहे, परंतु प्रतीक्षा करावी लागेल. कोहली आणि रोहित दोघेही २०२७ पर्यंत खेळतील, परंतु ही मालिका भारताच्या वनडे संघात त्यांचे भविष्य ठरवेल.

### टीम इंडियाच्या पराभवाला जबाबदार कोण? सुनील गावसकरांनी सांगितले नाव

मुंबई-न्यूझीलंडने गेल्या २ वर्षात भारतीय संघाला दुसरा सर्वात मोठा धक्का दिला आहे. याआधी डिसेंबर २०२४ मध्ये झालेल्या कसोटी मालिकेत भारतीय संघाला न्यूझीलंडकडून ३-० ने पराभवाचा सामना करावा लागला होता. या सामन्यानंतर सायमन डुलसोबत चर्चा करताना सुनील गावसकर यांनी भारतीय संघाच्या पराभवाचं कारण सांगितलं आहे. सुनील गावसकर म्हणाले, ''मी कोणाचं नाव घेणार नाही, पण काही खेळाडू असे होते ज्यांनी सर्वांना सहज एकेरी धावा घेऊ दिल्या. हो, रोहित शर्मा आणि विराट कोहली खूप चपळ आहेत पण मला असं वाटतं की, क्षेत्ररक्षणात आणखी सुधारणा होऊ शकली असती. विराट कोहलीने ९३,२४ आणि १२४ धावांची खेळी केली. पण रोहित शर्मा आणि रवींद्र जडेजाला हवी तशी कामगिरी करता आलेली नाही.''तसेच ते पुढे म्हणाले की, ''खराब क्षेत्ररक्षणामुळे खेळाडू सुस्त दिसले, ज्यामुळे न्यूझीलंडच्या फलंदाजांना सहज धावा घेण्याची आणि स्ट्राईक बदलण्याची संधी मिळाली आणि हेच भारतीय संघाच्या पराभवाचे मुख्य कारण ठरले.'

### टीम इंडियाच्या पराभवाला कारणीभूत ठरला, त्यालाच कोहलीने दिले मोठे गिफ्ट

इंदूर-इंदूरच्या अहिल्याबाई होळकर मैदानात रविवारी न्यूझीलंडने भारताचा अवघ्या ४१ पराभव केला होता. हा सामना जिंकून न्यूझीलंडने २-१ ने मालिका खिशात घातली होती. हा सामना जिंकल्यानंतर पोस्ट मॅच प्रेझेंटेशन दरम्यान ज्या खेळाडूंने टीम इंडियाचा पराभव केला होता, त्याच खेळडूला मोठं गिफ्ट दिलं होतं.या संदर्भातला व्हिडिओ देखील समोर आला आहे.

शेवटच्या वनडे सामन्यात प्रथम फलंदाजी करताना न्यूझीलंडच्या डेरी मिचेलने सर्वाधिक १३७ धावांची शतकीय खेळी केली होती. या खेळीच्या बळावर न्यूझीलंडने भारतासमोर ३३७ धावांचे लक्ष्य ठेवले होते.या लक्ष्याचा पाठलाग करताना एकट्या विराट कोहलीने १२४ धावांची एकाकी झूंज दिली होती. पण सामना अंतिम टप्प्यात असताना कोहलीची विकेट पकडली आणि भारताने सामना हरला.त्यामुळे डेरी मिचेलच्या या वादळी खेळीमुळे टीम इंडियाचा पराभव झाला होता.

### क्रिकेट चाहत्यांसाठी गुड न्यूज! भारत-पाकिस्तान एकाच दिवशी दोन वेळा भिडणार

मुंबई-भारत आणि पाकिस्तान हे दोन्ही संघ जेव्हा जेव्हा आमने सामने येतात तेव्हा क्रिकेट चाहत्यांना हाय व्होल्टेज सामना पाहायला मिळत असतो. गेल्यावेळी हे दोन्ही संघ आशिया चषक २०२५ स्पर्धेतील अंतिम फेरीत आमनेसामने आले होते. या सामन्यात भारतीय संघाने पाकिस्तानवर एकतर्फी विजय मिळवून जेतेपदाचा मान पटकावला होता. आता क्रिकेट चाहत्यांना पुन्हा एकदा भारत- पाकिस्तान सामन्याचा थरारा पाहायला मिळणार आहे. येत्या १५ फेब्रुवारीला एकाच दिवशी भारत- पाकिस्तान यांच्यातील दोन सामने पाहायची संधी क्रिकेट चाहत्यांना मिळू शकते. येत्या ७ फेब्रुवारीपासून आयसीसी टी-२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेला सुरूवात होणार आहे. ही स्पर्धा सुरू व्हायला अवघे काही दिवस शिल्लक राहिले आहेत. या स्पर्धेचे आयोजन भारत आणि श्रीलंकेत संयुक्तरित्या केले जाणार आहे. भारतीय संघाचा स्पर्धेतील पहिला सामना अमेरिकेविरूद्ध होणार आहे.

## फलंदाजांच्या अपयशाचा फटका!

▶क्षेत्ररक्षणात सुधारणा आवश्यक ▶क्षेत्ररक्षकांनी झेल सोडल्याचा फटका

# मोठ्या खेळीची संधी सातत्याने वाया घालवल्याने कर्णधार हर्षल गिलची नाराजी

इंदूर-न्यूझीलंडविरुद्ध मायदेशात एकदिवसीय मालिकेतही पराभव पत्करावा लागणे हे अपयश निश्चितच बोचणारे आहे. फलंदाजांची कामगिरी, फलंदाजीमधील दृष्टिकोन या दोन संघांतील मुख्य फरक होता, अशी कबुली भारताचा कर्णधार शुभमन गिल याने दिली. तिसऱ्या एकदिवसीय सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत गिलने दोन्ही संघांमध्ये जाणवलेल्या फरकाविषयी भाष्य केले. ङ्गङ्गआम्ही चांगली फलंदाजी केली नाही, असे नाही. तर आमच्या फलंदाजांना चांगल्या सुरुवातीचे मोठ्या खेळीत रुपांतर करण्यात अपयश आले. विशेषत: मोठ्या धावसंख्येच्या सामन्यात किमान दोन फलंदाजांकडून मोठी खेळी होणे गरजेचे होते. आम्ही त्यातच कमी पडलो,फफ असे गिल म्हणाला.संपूर्ण मालिकेत न्यूझीलंड आणि भारतीय संघांच्या फलंदाजांच्या दृष्टिकोनातील फरकच निर्णायक होता याकडे गिल वारंवार लक्ष वेधत होता. जेव्हा जेव्हा जम बसला, तेव्हा न्यूझीलंडच्या फलंदाजांनी मोठी धावसंख्या उभी केली. आमचे फलंदाज मात्र खेळपट्टीवर स्थिरावल्यानंतर त्याचे मोठ्या खेळीत रुपांतर करू शकले नाहीत. फलंदाजीच्या आघाडीवर आम्हाला निश्चितपणे सुधारणा करावी लागेल,फफ



मायदेशात एकदिवसीय मालिकेतही पराभव पत्करावा लागणे हे अपयश निश्चितच बोचणारे आहे.

### क्षेत्ररक्षणात सुधारणा आवश्यक

गिलने क्षेत्ररक्षणातील चुकांचाही भारताला फटका बसल्याचे मान्य केले. फलंदाजीला पोषक खेळपट्टीवर गोलंदाज प्रयत्नपूर्वक संधी निर्माण करत असतात. अशा वेळी त्यांना क्षेत्ररक्षकांकडून साथ मिळणे अपेक्षित असते. क्षेत्ररक्षकांनी झेल सोडल्याचा फटका आम्हाला बसला. कुणीही जाणुनबुजून झेल सोडत नसतो. परंतु हे असे क्षेत्र आहे जेथे आम्हाला सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. क्षेत्ररक्षणात वारंवार चुका करणे योग्य नाही, असेही गिल म्हणाला.

असे गिलने सांगितले.रवींद्र जडेजाची कामगिरी खालावल्याचा मुद्दा उपस्थित झाल्यावर गिलने त्याला सावरून घेतले. केवळ जडेजाच नाही, तर आमच्यापैकी एकही फलंदाज चांगल्या सुरुवातीनंतर मोठी खेळी करू शकला नाही. फलंदाजीसाठी अनुकूल खेळपट्टीचा तुम्ही फायदा करून घेणे आवश्यक असते, अन्यथा तुम्ही कायमच पिछाडीवर राहता. गोलंदाजीबाबत म्हणाल, तर जडेजाने संघासाठी अनेकदा महत्त्वपूर्ण बळी मिळवून आपले योगदान दिले आहे. मात्र अशी एखादी मालिका असते, की ज्यात तुम्ही अपेक्षित कामगिरी करू शकत नाही,फफ असे म्हणत गिलने जडेजाची पाठराखण केली. न्यूझीलंडविरुद्धच्या एकदिवसीय मालिकेनंतर विश्रांती घेण्यापेक्षा शुभमन गिलने रणजी सामन्यात सहभाग नोंदविण्यास पसंती दिली आहे. रणजी स्पर्धेच्या दुसऱ्या टप्प्याला गुरुवारपासून सुरुवात होणार असून यावेळी सौराष्ट्रविरुद्धच्या सामन्यात गिल पंजाब संघाचे प्रतिनिधित्व करणार आहे. ङ्गङ्गएकदिवसीय मालिकेनंतर शुभमनने विश्रांती घेणे टाळले आहे. तो पंजाबकडून रणजी सामना खेळणार आहे. इंदूरहून राजकोटसाठी थेट विमानसेवा नसल्याने त्याला आठ तास प्रवास करावा लागला,फफ असे पंजाब संघाच्या जवळील सूत्राकडून सांगण्यात आले. पंजाब संघाचे पाच सामन्यांत केवळ ११ गुण आहेत. त्यामुळे बाद फेरी गाठायची झाल्यास पंजाबला उर्वरित तीन सामने जिंकावे लागतील.

**हर्षितची कामगिरी मोलाची**

मालिकेतील सकारात्मक बाबींवर लक्ष टाकताना गिलने हर्षित राणाच्या फलंदाजीचे कौतुक केले. ङ्गङ्गतळाच्या फळीत हर्षितच्या कामगिरीने एका नव्या अष्टपैलू खेळाडूचा उदय झाला. आठव्या क्रमांकावरील फलंदाजाची कामगिरी अत्यंत महत्त्वाची ठरते. आम्हाला या क्रमांकावर अशा खेळाडूंना संधी द्यायची आहे, की जे फलंदाजीची खोली मजबूत करू शकतात. हर्षितने ती आशा पल्लवित केली आहे, असे गिलने आवर्जुन सांगितले.

## पाकिस्तानचा टेस्ट कॅप्टनच्या संघाला पेलवले नाही ४० धावांचे आव्हान; २३२ वर्ष जुना विक्रम मोडला

नवी दिल्ली -पाकिस्तानचा कर्णधार शान मसूदच्या सुई नॅशनल गॅस पाईपलाईन या संघाला प्रेसिडेंट ट्रॉफी स्पर्धेत ४० धावांचे आव्हान पेलवलं नाही आणि त्यांच्या पदरी नामुष्की ओढवणारा पराभव जमा झाला. कराची इथे झालेल्या या सामन्यात पाकिस्तान टेलिव्हिजन संघाने सुई गॅस पाईपलाईन संघाचा डाव ३७ धावांतच गुंडाळला आणि खळबळजनक विजयाची नोंद केली. फर्स्ट क्लास क्रिकेटमध्ये सगळ्यात कमी धावांचा बचाव केल्याचा विक्रम आता पाकिस्तान टेलिव्हिजन संघाच्या नावावर आहे. आधीचा विक्रम ओल्डफिल्ड संघाच्या नावावर होता. त्यांनी १९७४ मध्ये एमसीसी संघाला ४१ धावा करू दिल्या नव्हत्या. पाकिस्तानचा कसोटी कर्णधार शान मसूद शून्यावर बाद झाला. याव्यतिरिक्त सुई संघाचे दोन फलंदाज भोपळा फोडू शकले नाहीत. टेलिव्हिजन संघातर्फे डावखुरा फिरकीपटू अली उस्मान ९ धावांत ६ विकेट्स पटकावल्या. वेगवान गोलंदाज अमद बटने ४ विकेट्स घेत अलीला चांगली साथ दिली. पाकिस्तान टेलिव्हिनज संघाच्या १६६ धावांसमोर खेळताना सुई पाईपलाईन संघाने २३८ धावांची मजल मारली. त्यांनी ७२ धावांची आघाडी देखील मिळवली. पाकिस्तान टेलिव्हिजन संघाचा दुसरा डाव १११ धावांतच गडगडला. पण चौथ्या डावात सुई पाईपलाईन संघाची दाणादाण उडाली. अली उस्मान आणि अमान बट या दोघांनीच गोलंदाजी करत सुई पाईपलाईन संघाच्या डावाला खिंडार पाडलं. २० षटकांच्या आतच पाकिस्तान टेलिव्हिजन संघाने अविश्वसनीय विजय मिळवला. सुई पाईपलाईन संघाकडून सैफुल्ला बंगशने सर्वाधिक १४ धावा केल्या. बाकी कोणत्याही फलंदाजाला दुहेरी धावसंख्या गाठता आली नाही.काही दिवसांपूर्वीच मसूदने १७७ चेंडूत द्विशतक पूर्ण करत फर्स्ट क्लास क्रिकेटमधल्या वेगवान द्विशतकाची नोंद केली होती.



# व्हिडिओ पडला महागात, टीम इंडियाच्या फिनिशरची एक चूक

नवी दिल्ली : भारतीय फलंदाजाने फेसबुकवर देवाचा एआय व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामुळे तो नवीन वादात सापडला आहे. करणी सेनेने रिंकू सिंह विरुद्ध अलीगडमधील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. आता पोलीस यावर काय कारवाई करणार याकडे सर्वांचं लक्ष आहे.

पूजा पवार । णविरींशव: गरप १९, २०२६, ०८:२६ झच् खडढ

-ख व्हिडिओ पडला महागात, टीम इंडियाच्या मफिनिशरफची एक चूक अन् थेट पोलीस स्टेशन गाठण्याची वेळ सोशल मीडियावर सध्या एआय जनरेटेड अनेक व्हिडीओ व्हायरल होताना दिसतात. मात्र असाच एका व्हिडीओमुळे भारतीय फलंदाज रिंकू सिंह (ठळपज्ञी डळपसह) अडचणीत आलाय. भारतीय फलंदाजाने फेसबुकवर देवाचा एआय व्हिडिओ शेअर केला होता, ज्यामुळे तो नवीन वादात सापडला आहे. करणी सेनेने रिंकूविरुद्ध अलीगडमधील पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली असून त्याच्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. व्हिडीओमध्ये नेमकं काय? व्हिडिओमध्ये रिंकू सिंह हा मैदानावर जबरदस्त फलंदाजी करताना दिसतोय. या फोटोला कॅप्शन देताना रिंकू सिंहने लिहिले




की, मतुला कोणी क्रिकेटर बनवले?फ या पुढील फुटेजमध्ये भगवान शिव, हनुमान, विष्णू आणि गणेश हे थारमध्ये बसलेले दिसतायत. या सर्व देतांना काळे चष्मे घातलेले असून स्वतः हनुमान गाडी चालवत आहेत. या व्हिडिओच्या बॅकग्राउंडला एक इंग्रजी गाणं वाजतंय.

व्हिडीओमुळे सोशल मीडियावर वाद : रिंकू सिंहने शेअर केलेल्या व्हिडीओवरून सोशल मीडियावर वाद सुरु आहे. काही लोक म्हणतात की रिंकू सिंहचा हेतू चांगला होता आणि असे व्हिडीओ शेअर करण्यात काहीही चूक नाही. तर काही लोकांचं म्हणणं आहे की हे धार्मिक भावनांशी छेडछाड करणारे कृत्य आहे. रिंकू सिंहचा हा व्हिडीओ व्हायरल होताच करणी सेनेनं यावर तीव्र नाराजी व्यक्त केली. जिल्हाध्यक्ष सुमित तोमर यांनी कार्यकर्त्यांसह रविवारी सासनी गेट पोलिस स्टेशन गाठले आणि रिंकू सिंगविरुद्ध तक्रार दाखल केली. सुमित तोमर म्हणाले की, मरिंकू सिंगने शाहरुख खानप्रमाणेच त्याची मजिहादीफ मानसिकता दाखवली आहेफ

हा तर सनातन धर्माचा अपमान - सुमित तोमर :

करणी सेनेचे जिल्हाध्यक्ष सुमित तोमर म्हणाले की, मरिंकू सिंग हा शाहरुख खानच्या आयपीएल संघ कोलकाता नाईट रायडर्सचा भाग आहे. शाहरुखप्रमाणेच रिंकूनेही त्याची खरी मानसिकता उघड केली आहे. आपल्या देवाला काळे चष्मे लावायला लावणे, त्याला थारमध्ये गाडी चालवायला लावणे आणि त्याला इंग्रजी गाण्यांवर नाचताना दाखवणे हे श्रद्धेशी खेळणे आहेफ

हटवला नंबर, संपूर्ण वर्ल्ड कप नंबर नसलेली जर्सी घालून खेळला

पोलीस काय कारवाई करणार?

पोलीस स्टेशनचे प्रभारी म्हणाले की, मरिंकू सिंहने शेअर केलेल्या व्हिडिओची सत्यता तपासली जाईल, रणी सेनेने तक्रार दाखल केली आहे. या प्रकरणाची चौकशी केली जाईल. व्हिडिओची सत्यता पडताळून पाहिल्यानंतर आणि तो पोस्ट करणाऱ्या व्यक्तीची चौकशी केल्यानंतरच कायदेशीर कारवाई केली जाईलफ

बालपणी उराशी स्वप्न बाळगले, १९ दिवसानंतर पूर्ण होणार!

# विराटला भिडणारा सौरभ नेत्रावळकर का झाला भावुक?

मुंबई -ज्या मातीत क्रिकेटचे पहिले धडे गिरवले, ज्या मैदानावरून आंतरराष्ट्रीय क्रिकेटचे स्वप्न पाहिले, त्याच वानखेडे स्टेडियमवर तब्बल अनेक वर्षांनंतर परतणे, ही सौरभ नेत्रावळकरसाठी केवळ एक 'मॅच' नसून त्याच्या आयुष्याचे 'पूर्ण वर्तुळ' आहे, असं म्हटलं तर चुकीचं ठरणार नाही. अमेरिकन क्रिकेट संघात खळबळ माजवणारा भारतीय वंशाचा वेगवान बॉलर सौरभ नेत्रावळकर सध्या आपल्या जबरदस्त कामगिरीमुळे जागतिक क्रिकेटमध्ये चर्चेचा विषय ठरला आहे. मूळचा मुंबईचा असलेला हा खेळाडू आता भारतात भारताविरुद्ध खेळणार आहे.

सौरभ नेत्रावळकर म्हणतो, ''हा माझ्यासाठी अत्यंत हळवा क्षण आहे. मी मुंबईतच क्रिकेटला सुरुवात केली आणि तिथेच ते सोडलेही होते. अमेरिकेला गेल्यावर आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये मी पुन्हा येईन, असे स्वप्नातही वाटले नव्हते. पण आज नियतीने मला पुन्हा माझ्या घरी, माझ्या माणसांसमोर आणून उभे केले आहे.'' सौरभने आपल्या क्रिकेट कारकिर्दीची सुरुवात मुंबईतून केली होती आणि २०१० मध्ये भारताच्या अंडर-१९ वर्ल्ड कप संघात तो सर्वाधिक विकेट्स घेणारा बॉलर होता.आपल्या कुटुंबासमोर आणि जिवलग मित्रांसमोर वानखेडेच्या ऐतिहासिक मैदानावर आंतरराष्ट्रीय सामना खेळणं, हे सौरभचे बालपणीचे स्वप्न होतं. ७ फेब्रुवारीचा तो दिवस त्याच्यासाठी केवळ एक तारीख नसून, त्याच्या कष्टांचे आणि संयमाचे फळ असेल, असे सौरभ म्हणतो. कोडिंग आणि क्रिकेट या दोन टोकांच्या जगात ताळमेळ बसवत सौरभने दाखवून दिले की, जर मनात जिद्द असेल तर विखुरलेली स्वप्ने पुन्हा नक्कीच सावरता येतात. मुंबईचा मुलगा आता वानखेडेवर खेळणार आहे. २०१३ मध्ये याच मुंबईसाठी सौरभने सूर्यकुमार यादव आणि शार्दुल ठाकूर यांसारख्या खेळाडूंसोबत प्रथम श्रेणी क्रिकेट खेळले होते. क्रिकेटची आवड बाजूला सारून तो २०१५ मध्ये उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला गेला. कॉर्नेल विद्यापीठातून

## टी २० वर्ल्डकप । आयसीसीनं आता बांगलादेशला शेवटचा इशारा दिला

# भारतात खेळावे लागेल, लवकर निर्णय कळवा, अन्यथा दुसऱ्या संघाला संधी

नवी दिल्ली-टी २० वर्ल्डकपमध्ये भारतात खेळण्याशिवाय दुसरा पर्याय बांगलादेशकडे राहिलेला नाही. बांग्लादेश क्रिकेट बोर्डानं वारंवार आयसीसीकडे श्रीलंकेत सामने खेळवण्याची मागणी केली होती. आयसीसीनं आता बांगलादेशला शेवटचा इशारा दिला आहे. बांगलादेशने निश्चित झालेल्या वेळापत्रकाप्रमाणं भारतात सामने खेळावेत अन्यथा दुसऱ्या संघाला वर्ल्ड कपमध्ये खेळण्याची संधी देऊ असे सांगण्यात आले आहे.

बांगलादेश सरकारचे क्रीडा सल्लागार आसिफ नजरुल वारंवार वादग्रस्त वक्तव्य करत आहेत. बांगलादेशच्या क्रिकेटपटूंच्या भारतातील सुरक्षेबाबत बीसीबीने ज्या बाबी मांडल्या त्या आयसीसीने स्वीकारल्याचे खोटे वक्तव्य देखील आसिफ नजरुल यांनी केले होते. नजरुल यांचे ते वक्तव्य खोटे असल्याचे समोर आले होते.

भारताने यापूर्वी वनडे वर्ल्ड कप, टी २० वर्ल्ड कपचं यशस्वी आयोजन केलं आहे. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं सुरक्षेबाबत ज्या गोष्टी मांडल्या होत्या, त्या आयसीसीनं मान्य केलेल्या नाहीत. बांगलादेशनं आता २१ जानेवारीपर्यंत त्यांचा अंतिम निर्णय घ्यावा. बांगलादेश भारतात खेळण्यास तयार नसेल तर त्यांची स्कॉटलँडला दिली जाऊ शकते, असा इशारा बांगलादेशला आयसीसीनं दिले आहेत.

आयसीसीच्या इशाऱ्यानुसार बांगलादेशला त्यांचे सामने भारतात खेळावे लागतील. बांगलादेश भारतात खेळण्यास तयार नसेल तर त्यांना टी २० वर्ल्ड कपमधून बाहेर जावे लागेल. आयपीएलमधून मधून मुस्तफिजूर रहमानला वगळल्यानंतर बांगलादेश क्रिकेट बोर्डानं त्यांचे सामने श्रीलंकेत खेळवावे, अशी मागणी पहिल्यांदा केली होती. बांगलादेश क्रिकेट बोर्डानं बांगलादेश सरकारच्या सांगण्यावरुन आयसीसीकडे भारतातील सुरक्षेबाबत प्रश्न उपस्थित केले होते. मात्र, आयसीसीच्या निर्णयाने बांगलादेशची बोलती बंद झाली आहे. आयसीसीनं निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार बांग्लादेश सी ग्रुपमध्ये आहे. या गटात इंग्लंड, वेस्ट इंडीज, इटली आणि नेपाळ आहे. बांगलादेशचे सामने कोलकाता आणि मुंबईत होणार आहेत.

दरम्यान, बांगलादेशनं त्यांचा टी २० वर्ल्ड कपमधील ग्रुप बदलावा अशी मागणी देखील केली होती. आयसीसीनं या मागणीकडे देखील दुर्लक्ष केल्याचं पाहायला मिळतंय.

२०२६ च्या टी २० वर्ल्ड कपचं आयोजन भारत आणि श्रीलंकेकडून केलं जाणार आहे. पाकिस्तानचे सामने श्रीलंकेत होणार आहेत. याचाच आधार घेत बांगलादेश क्रिकेट बोर्डानं टी २० वर्ल्ड कपमधील सामने श्रीलंकेत खेळवण्याची मागणी केली होती. मात्र, आयसीसीनं बांगलादेशची मागणी फेटाळून लावल्याचं पाहायला मिळतं. या सर्व वादाची सुरुवात आयपीएलमधून कोलकाता नाईट रायडर्सने मुस्तफिजूर रहमानला वगळल्यानंतर झाली होती. बांगलादेश सरकारने आयपीएलच्या सामन्यांच्या प्रक्षेपणावर बंदी देखील घातली आहे.



## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी वासनगावचे सरपंच रमेश थोरमोटे पाटील कुटुंबीयांचे केले सांत्वन



**लातूर प्रतिनिधी:** लातूर तालुक्यातील वासनगावचे सरपंच रमेश थोरमोटे पाटील यांचे वडील माधवराव रामराव थोरमोटे पाटील यांचे नुकतेच निधन झाले. माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सोमवार दि. १९ जानेवारी रोजी लातूर शहरातील महादेव नगर येथील वासनगावचे सरपंच रमेश थोरमोटे पाटील यांच्या निवासस्थानी भेट देऊन थोरमोटे पाटील कुटुंबियांचे सांत्वन करून त्यांना धीर दिला.

यावेळी ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे संचालक हनमंत पवार, सुरेश थोरमोटे पाटील, श्रीकृष्ण थोरमोटे पाटील, सतीश थोरमोटे पाटील, हरीश थोरमोटे पाटील, नरेश थोरमोटे पाटील, विकास थोरमोटे पाटील, सुखदेव थोरमोटे पाटील, व्यंकुराम थोरमोटे पाटील आदिसह थोरमोटे पाटील कुटुंबीय उपस्थित होते.

## रा.से.यो. शिबिरात अंधश्रद्धा निर्मूलनावर प्रबोधनात्मक व्याख्यान




**लातूर प्रतिनिधी:** दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना (रा.से.यो.) विभागाच्या वतीने आयोजित सात दिवसीय वार्षिक विशेष युवक श्रमसंस्कार शिबिराच्या प्रसंगी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कार्यकर्ते श्री. माधव बावगे सर यांच्या प्रभावी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. संदर्भीय व्याख्यान समाजातील अंधश्रद्धा, रूढी व अपप्रथा विचारात घेऊन योजिले होते. अंधश्रद्धेमुळे समाजाची बौद्धिक व सामाजिक प्रगती कशी खुंटते, याचे विवेचन त्यांनी विविध उदाहरणांद्वारे केले.

रा.से.यो. हे युवकांच्या सुप्त गुणांना वाव देणारे आणि समाजप्रबोधनासाठी सक्षम व्यासपीठ असल्याचे नमूद करत, युवकांनी विवेकवादी विचारसरणी अंगीकारून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या चळवळीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन श्री. बावगे सर यांनी केले. या कार्यक्रमास अ.नि.स. चे जिल्हा कार्यवाह श्री. भोसले सर, रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी डॉ. विशाल वर्मा, प्रा. निलेश मंत्री, प्रा. योगेश शर्मा, व इतर प्राध्यापक, स्वयंसेवक विद्यार्थी, ग्रामस्थ आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. योगेश शर्मा यांनी करून उपस्थितांचे व मान्यवरांचे आभार मानले.

## श्री गुरु तेग बहादूर साहिबजींच्या ३५० व्या शहादत सोहळ्यासाठी गृहमंत्री अमित शाह यांना निमंत्रण

**लातूर प्रतिनिधी:** श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त हिंद दी चादर हा भव्य व ऐतिहासिक कार्यक्रम २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी नांदेड येथे आयोजित केला आहे. या सोहळ्याचे निमंत्रण केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शाह यांना राज्यस्तरीय समागम समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष भेटीदरम्यान दिले.

नवी दिल्ली येथे राज्यस्तरीय समागम समितीच्या (महाराष्ट्र राज्य) पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची सदिच्छा भेट घेऊन निमंत्रण दिले. केंद्रीय गृहमंत्री शाह यांनी २५ जानेवारी रोजी आयोजित कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे निमंत्रण स्वीकारले. यावेळी पोहरादेवीचे महंत बाबुसिंग महाराज (सहअध्यक्ष), समन्वय समितीचे अध्यक्ष रामसिंग महाराज, नांदेड येथील गुरुद्वारा प्रशासक डॉ. विजय सतबीर सिंग, समन्वयक श्री. रामेश्वर नाईक, सहसमन्वयक जसपाल सिंग, सदस्य चरणदीप सिंग (हॅप्पीसिंग), सतिश निहलानी आणि सहनिमंत्रक तेजासिंग बावरी आदी उपस्थित होते.

नांदेड येथील मोदी मैदान येथे आयोजित या सोहळ्याला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह हे २५ जानेवारीला दुपारी २ ते ५ या वेळेत उपस्थित राहणार आहेत. तसेच, पं. धीरेंद्र कृष्ण शास्त्री (बागेश्वर धाम सरकार) उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी देखील निमंत्रण स्वीकारले असून ते २४ जानेवारीला या सोहळ्याला उपस्थित राहतील, अशी माहिती समितीच्या वतीने देण्यात आली.

# जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक २०२६; आदर्श आचारसंहिता अंमलबजावणीसाठी विविध प्रतिबंधात्मक आदेश लागू

**लातूर प्रतिनिधी:** : राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या १० पंचायत समित्यांचा सार्वत्रिक निवडणूक कार्यक्रम घोषित केला आहे. त्याच दिवशीपासून या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्रात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. ही निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये विविध आदेश निर्गमित केले आहेत.

**होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक**

निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था तसेच त्या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या ग्रामीण क्षेत्रामध्ये निवडणूक कालावधीत होर्डींग्ज, बॅनर्स, पोस्टर्स, जाहिरात लावताना स्थानिक प्राधिकरणाची परवानगी बंधनकारक राहणार आहे. तसेच परवानगी संपल्यानंतर इमारती, मालमत्ता पूर्ववत करून घेणे, जाहिराती तत्काळ काढून घेणे आवश्यक आहे. तसेच या क्षेत्रात शासकीय, निमशासकीय, सार्वजनिक मालमत्तेचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष स्वरुपात विद्रुपता करण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.

शासकीय कार्यालये, विश्रामगृहे परिसरात मिरवणुका, घोषणा, उपोषण, सभा घेण्यावर निर्बंध

जिल्हा परिषद व त्याअंतर्गत असलेल्या १० पंचायत समित्यांची निवडणूक संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निर्गमित केलेल्या आदेशानुसार स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रात निवडणूक कालावधीत शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था कार्यालये, विश्रामगृहे इत्यादी परिसरात मिरवणुका, घोषणा देणे, सभा घेणे, आवाराचा राजकीय कामासाठी वापर करणे, रॅली काढणे, निवडणूक संबंधाने पोस्टर, बॅनर्स, पाम्प्लेटस, कटआऊट, पेंटींग्ज, होर्डींग्ज लावणे, निवडणूक विषयक घोषवाक्य लिहिणे किंवा घोषणा देणे किंवा मतदाराला प्रलोभन दाखविणे आणि निवडणूक कामात बाधा निर्माण होईल, अशी कृती करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणुकीत नमुना मतपत्रिका छपाईवर निर्बंध**

निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने मुद्रणालयाचे मालकाने व इतर सर्व माध्यमाद्वारे छपाई करणाऱ्या मालकाने तसेच प्रकाशकाने नमुना मतपत्रिका छापतांना इतर उमेदवाराचे नाव व त्यांनी नेमून देण्यात आलेले चिन्ह वापरणे, नमुना मतपत्रिकेसाठी आयोगाने निश्चित केल्याप्रमाणे कागद वापरणे व आयोगाने निश्चित केलेल्या कागदाच्या आकारामध्ये नमुना मतपत्रिका छापणे या बाबींवर निर्बंध घालण्यात आले आहेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हादंडाधिकारी यांनी नमुना मतपत्रिका छपाईस निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

**शासकीय कार्यालयांच्या परिसरात उपोषण, मोर्चा, निदर्शने, घेराव करण्यास मनाई**

जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच निवडणुकीवर प्रभार पडणारे जिल्ह्यातील जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, उपविभागीय कार्यालये, तालुका दंडाधिकारी, सर्व शासकीय व सर्व निमशासकीय कार्यालये, संस्था, शासकीय विश्रामगृह, सार्वजनिक ठिकाणे, रस्त्याच्या ठिकाणी धरणे आंदोलन, मोर्चा, निदर्शने, उपोषण, आत्मदहन इत्यादी विविध प्रकारची आंदोलने करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बध घालण्यात आले आहेत.

**धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था, सार्वजनिक ठिकाणांच्याजवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध**

जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक आदर्श आचारसंहिता काळात जिल्ह्यात निवडणूक होणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती या स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच या निवडणुकीवर प्रभाव पडणारे लगतचे क्षेत्रातील धार्मिक स्थळे, रुग्णालये किंवा शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास प्रतिबंध करण्यात आला आहे. याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी निर्गमित केले आहेत.

**प्रचार फेरीमध्ये जास्तीत जास्त १० वाहने वापरण्यास मुभा**

जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक प्रचार फेरी, मिरवणुकीत जास्तीत जास्त १० वाहने वापरता येतील. त्यापेक्षा जास्त वाहने वापरण्यास जिल्ह्यातील निवडणूक होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था, तसेच या निवडणुकीवर प्रभाव पडणारे लगतचे क्षेत्रात निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

निवडणूक निणर्य अधिकारी यांच्या कार्यालय परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत पंचायत समितीत्यांची निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून निवडणूक कालावधीत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी उमेदवारांना वाहनांच्या ताफ्यामध्ये तीनपेक्षा जास्त मोटार गाड्या, वाहनांचा समावेश करण्यास मनाई राहील. तसेच उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाच्या १०० मीटर परिसरात, तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या कार्यालयाचे अवारात फक्त उमेदवार, सूचक तथा अनुमोदक अथवा दोन व्यक्ती यांना परवानगी दिली जाईल. तसेच निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नामनिर्देशन पत्र दाखल करतेवेळी कार्यालयाच्या परिसरात मिरवणूक, सभा घेणे, कोणत्याही प्रकारच्या घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणी म्हणणे आणि कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणेस प्रतिबंध करण्यात आला आहे.

**प्रचार वाहनांवर कापडी फलके, झेंडे लावण्याबाबत आदेश**

स्थानिक स्वराज्य मतदारसंघ कार्यक्षेत्रासह या निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या क्षेत्रात वाहनांवर पक्ष प्रचाराचे कापडी फलक, झेंडे लावणे इत्यादी बाबीसाठी निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यानुसार फिरत्या वाहनांवर पक्ष प्रचाराचा झेंडा हा वाहनाच्या डाव्या बाजूला विंड स्क्रीन ग्लासच्या पुढे राहणार नाही आणि तो त्या वाहनाच्या टपापासून २ फुट उंची पेक्षा जास्त राहणार नाही. प्रचाराच्या फिरत्या वाहनावर कापडी फलक वाहन चालकाच्या आसनामागे वाहनाच्या डाव्या व उजव्या बाजुनेच लावण्यात यावा. इतर कोणत्याही बाजूस तो लावता येणार नाही. फिरत्या वाहनांवर लावावयाचा पक्ष प्रचाराचा झेंडा किंवा कापडी फलक संबंधीत पक्षाचे जिल्हाध्यक्ष, उमेदवार व उमेदवाराचे निवडणूक प्रतिनिधी, निवडणूक प्रचारासाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून अधिकृत परवानगी घेतलेल्या वाहनांव्यतिरिक्त इतर कोणत्याही वाहनावर लावता येणार नाही.

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ध्वनिक्षेपक वापरावर निर्बंध**

जिल्हा परिषद, पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक काळात वाहनांवर ध्वनीक्षेपक बसवून त्याचा वापर फक्त सकाळी ६ वाजलेपासून ते रात्री १० वाजेपर्यंत संबंधित पोलीस अधिकारी यांची रीतसर परवानगी घेवूनच करता येईल. फिरत्या वाहनावर ध्वनीक्षेपकाचा वापर करता येणार नाही, विशिष्ट ठिकाणी थांबूनच ध्वनीक्षेपकाचा वापर करावा. सर्व राजकीय पक्ष व त्यांचे उमेदवार किंवा इतर व्यक्तींनी निश्चित ठिकाणी ध्वनीक्षेपकाच्या वापराबाबत घेतलेल्या परवानगीची माहिती जिल्हादंडाधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी व संबंधित यंत्रणेस कळविणे बंधनकारक राहील.

**खाजगी व्यक्तीच्या जागेवर, सार्वजनिक जागेवर झेंडे, भितीपत्रके लावण्यास निर्बंध**

जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणूक क्षेत्रात व निवडणुकीवर प्रभाव पडणाऱ्या लगतच्या क्षेत्रात निवडणूकीच्या प्रचारासाठी कोणत्याही व्यक्तीगत जागा, इमारत, आवार, भिंत आदी ठिकाणांच्या संबंधित जागा मालकाच्या परवानगीशिवाय व संबंधित परवाना देणाऱ्या प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय प्रचारासाठी वापर करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत निर्बंध घालण्यात आले आहेत.

**सार्वजनिक रस्त्यावर, रहदारीस अडथळा निर्माण न होवू देण्यासाठी निर्बंध**

लातूर जिल्हा परिषद व त्या अंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक काळात राजकीय पक्षांनी, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांनी किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी किंवा त्यांच्या हितचिंतकाने सार्वजनिक इमारतीच्या ठिकाणी, सार्वजनिक रस्त्यावर, निवडणूकीच्यासंबंधी पोस्टर्स, बॅनर्स, पॉम्प्लेट्स, कटआऊटस, होर्डींग्ज, कमानी लावणे या व इतर बाबींमुळे रहदारीस अडथळा निर्माण होवू शकतो. तसेच त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नसल्यामुळे त्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३३ अन्वये निवडणुकीचे सर्व साहित्य कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी, रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होईल, अशा पध्दतीने लावण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्णपणे निर्बंध घालण्यात येत असल्याचे आदेश निर्गमित केले आहेत.

**मतदान व मतमोजणी केंद्रांच्या २०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश लागू**

लातूर जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १० पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान व ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होणार आहे. मतदान व मतमोजणी काळात शांतता, निर्भयता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अंतर्गत प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार सर्व मतदान व मतमोजणी केंद्रांपासून २०० मीटर परिसरात मतदान सुरू झाल्यापासून ते मतदान संपेपर्यंत. मतदान केंद्रापासून २०० मीटर परिसरात मंडपे, दुकाने किंवा तात्पुरत्या रचनांचे उभारणे पूर्णपणे प्रतिबंधित राहील. मोबाईल फोन, स्मार्ट फोन, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपक (लाउडस्पीकर) व इतर कोणत्याही इलेक्ट्रॉनिक उपकरणे बाळगणे किंवा वापरणे यावर बंदी राहील. निवडणूक कामाशी संबंधित नसलेली खाजगी वाहने आणणे, संबंधित पक्षाचे चिन्हे प्रदर्शित करणे, निवडणूक कामाशी संबंधित नसलेल्या व्यक्तींना मतदान केंद्र परिसरात प्रवेश करण्यास मनाई राहील.

## हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा धार्मिक सहिष्णुता, मानवतेचा संदेश पोहोचतोय घरातघरात




हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त राज्य शासनाचा अल्पसंख्याक विकास विभाग आणि राज्यस्तरीय समागम समितीमार्फत नांदेड येथे २४ व २५ जानेवारी २०२६ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्ताने लातूर जिल्ह्यात विशेष जनजागृती कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे, ज्याचा मुख्य उद्देश गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या बलिदानाचा इतिहास, त्यांचा धार्मिक सहिष्णुता व मानवतेचा संदेश नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे हा आहे.

शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांना 'हिंद-दी-चादर' अर्थात भारताची ढाल म्हणून ओळखले जाते. त्यांनी मानवता आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी आपले प्राण पणाला लावले. त्यांच्या बलिदानामुळे धार्मिक सहिष्णुता आणि मानवाधिकारांचे एक अनोखे उदाहरण जगासमोर आले. या बलिदानाला ३५० वर्षे पूर्ण झाली झाली, त्यानिमित्त नांदेड येथे २४ आणि २५ जानेवारी २०२६ रोजी भव्य शहीदी समागम कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमासाठी लाखो भाविक येण्याची शक्यता आहे, यासाठी सज्जता सुरु आहे.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा इतिहास घराघरात पोहचावा, यासाठी शिक्षण विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. राज्य समन्वयक समितीच्या शिफारशीप्रमाणे गुरु तेग बहादूर साहिबजींच्या जीवनावरील विशेष गीत जिल्ह्यातील २ हजार ६६६ शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दररोजच्या परिपाठात गाण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यानुसार कार्यवाही सुरु झाली असून हे गीत विद्यार्थ्यांना आणि समाजातील नागरिकांना हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या गौरवशाली इतिहासाची ओळख करून देण्यासाठी उपयुक्त ठरत आहे. हे गीत त्यांच्या त्याग, साहस आणि धार्मिक सहिष्णुतेचे संदेश देत आहे. यासोबतच शाळांमधून काढण्यात आलेल्या प्रभात फेरीत विद्यार्थी उत्स्फुर्तपणे सहभागी होत आहेत. या माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा मानवता आणि धार्मिक स्वातंत्र्याच्या संदेश नागरिकांपर्यंत पोहचविला जात आहे.

शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असलेले हे उपक्रम केवळ माध्यमातून श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या इतिहासाचे स्मरण नसून, या माध्यमातून धार्मिक सहिष्णुता, मानवता आणि सत्याच्या रक्षणाचे धडे नव्या पिढीला मिळत आहेत. शिक्षण विभागाच्या या प्रयत्नांमुळे लातूर जिल्ह्यातील तरुणाईपर्यंत गुरु तेग बहादूर साहिबजी यांची शिकवण पोहचत असून त्यांच्या आदर्शांनी नव्या पिढीला मिळत आहे.

**– जिल्हा माहिती कार्यालय, लातूर**

## हिंद-दी-चादर' कार्यक्रमासाठी नांदेड सज्ज !


**१० लाख भाविकांची मांदियाळी – विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर**

**लातूर प्रतिनिधी:** नांदेड नगरी एका ऐतिहासिक सोहळ्यासाठी सज्ज होत आहे. शीख धर्माचे नववे गुरु श्री गुरु तेग बहादूर साहिब जी यांचा ३५० वा 'शहीदी समागम' हा भव्य कार्यक्रम येत्या २४ आणि २५ तारखेला पार पडणार आहे. त्यासाठी प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. देश-विदेशातून सुमारे १० लाख भाविक या सोहळ्यासाठी नांदेडमध्ये दाखल होण्याची शक्यता असल्याचे विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या दृष्टीने प्रशासनाने सूक्ष्म नियोजन केले आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध समित्या स्थापन केल्या आहेत. यात बुटांच्या व्यवस्थेपासून ते भोजनापर्यंतच्या जबाबदाऱ्या वाटून देण्यात आल्या आहेत. भाविकांसाठी ८ ठिकाणी अखंड 'लंगर' (महाप्रसाद) सुरू राहतील. तसेच, त्यांच्या निवासाचीही उत्तम व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रम ठिकाणी आरोग्य शिबिरे उभारण्यात आली आहेत. यासोबतच शासकीय योजनांचे आणि विविध उद्योजकांचे स्टॉल्सही उपलब्ध असतील.

या सोहळ्याला अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि इतर राज्यांचे मुख्यमंत्रीही नांदेडमध्ये येतील. त्यामुळे सुरक्षिततेच्या दृष्टीनेही कडेकोट तयारी करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचा अल्पसंख्याक विभाग या कार्यक्रमासाठी 'नोडल एजन्सी' म्हणून काम पाहत आहे.

हा कार्यक्रम एका समाजापुरता मर्यादित नाही. यात लबाना, बंजारा,सिकलीगर, बंजारा, लबाना, सिंधी, मोहयाल आदींसह आणि इतर सर्व समुदायांचे लोक मोठ्याप्रमाणात सहभागी होत आहेत.

आजच्या धावपळीच्या जगात 'त्याग आणि सेवा' हीच खरी माणुसकी आहे. हा विचार जपण्याची ही सुवर्णसंधी आहे. त्यामुळे मराठवाडा आणि महाराष्ट्रातील जनतेसह देशभरातील जनतेने या ऐतिहासिक सोहळ्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. ज्यांना या महायज्ञात सेवा (स्वयंसेवक म्हणून) द्यायची आहे, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही त्यांनी नमूद केले.

## श्री गुरुकुल स्कॉलर्स प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे १० वे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

**लातूर प्रतिनिधी:** येथील सिग्नल कॅम्प भागातील ''श्री गुरुकुल स्कॉलर्स'' प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूलचे २०२५-२६ चे वार्षिक स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात व थाटामाटात साजरे करण्यात आले.




''श्री गुरुकुल स्कॉलर्स'' प्री-प्रायमरी इंग्लिश स्कूल ची वाटचाल अतिशय चांगल्या पद्धतीने चालू असुन या स्कूल ने यावर्षी १० व्या वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. या स्कूल तर्फे वर्षभरात वेगवेगळे सार्वजनिक उपक्रम राबविण्यात येतात. त्यात विशेष म्हणजे शाळेतील मुलांना त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षाचे रोप भेटवस्तू म्हणून दिले जाते, तसेच त्या रोपाचे संगोपन व त्याबद्दल चे महत्व ही मुलांना व त्याच्या कुटुंबाला सांगण्यात येते.

यावर्षी स्नेहसंमेलनाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे लातूर मधील सुप्रसिद्ध वकील ॲड.बालाजी पांचाळ, सुप्रसिद्ध बांधकाम डेव्हलपर इंजि.अतुल कदम यांच्या हस्ते करण्यात आले, यावेळी संस्थेचे अध्यक्ष ॲड.किरण बडे हे उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागतही झाडांची रोपटे देऊन करण्यात आले. यावेळी २०२५-२६ मधील ''बेस्ट स्टुडंट ऑफ द इयर'' हे पुरस्कारही प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात आले. सदरील पुरस्कार श्लोक आचार्य, अमय वाडीवाले, आराध्या उपाळे व तन्वी स्वामी या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आले. यावेळी स्कूल मधील या लहान चिमुकल्यांनी आपल्या सुंदर नृत्याचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका सौ. प्रिया किरण बडे यांनी केले, सूत्रसंचालन श्री. शिवपुत्र स्वामी सर यांनी केले, मुलांचे नृत्याविष्कार श्री.रमेश भिसे सर यांनी अतिशय सुंदर रित्या घडवून आणले, तर आभार प्रदर्शन श्रीजनी मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला स्कूलचे शिक्षक वर्ग, कर्मचारी, विद्यार्थी, माजी विद्यार्थी तसेच शाळेच्या १० वर्ष स्थापनेपासूनचा पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर बंदी कलम १६३ अन्वये आदेश

धाराशिव (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम घोषित केला असून, कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून,भारत निवडणूक आयोगाच्या आदेश अन्वये दिलेल्या निर्देशांनुसार,कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून निवडणूक घोषित झाल्यापासून निकाल जाहीर होईपर्यंत परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर निर्बंध लागू झाले आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणाऱ्या व्यक्ती, दंडाधिकारी शक्ती प्रदान केलेले अधिकारी कर्मचारी तसेच बँकांच्या सुरक्षा व्यवस्थेवरील अधिकारी/कर्मचारी यांच्याव्यतिरिक्त इतर सर्व परवानाधारक व्यक्तींना परवाना दिलेली शस्त्रास्त्रे वाहून नेण्यावर या आदेशान्वये बंदी घालण्यात येत आहे.

हे आदेश जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हद्दीत,निर्गमित झाल्याच्या तारखेपासून ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अंमलात राहतील.

# कार्यालये / विश्रामगृहे परिसरात मिरवणूक,घोषणा,सभा इत्यादींवर निर्बंध

धाराशिव, (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम घोषित केला असून, कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून सभा, मिरवणुका,निवडणूक प्रचार इत्यादी बाबी नियंत्रित करणे आवश्यक आहे.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये निवडणुकीच्या कालावधीमध्ये जिल्हाधिकारी कार्यालय,सर्व उपविभागीय अधिकारी कार्यालय, सर्व तहसील कार्यालय तसेच सर्व शासकीय विश्रामगृहे या ठिकाणी, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हद्दीत खालील बाबी करण्यास या आदेशान्वये बंदी घालण्यात येत आहे कोणत्याही प्रकारची मिरवणूक / मोर्चा काढणे,आंदोलन करणे, निदर्शने करणे,उपोषण करणे. कोणत्याही प्रकारची घोषणा देणे, वाद्य वाजविणे किंवा गाणे म्हणणे इत्यादी.कोणत्याही प्रकारचा निवडणूक प्रचार करणे यास बंदी राहील.हा आदेश १३ जानेवारी ते ०७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपूर्ण जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हद्दीत अंमलात राहील.

# धार्मिक स्थळे,रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांजवळ तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध

धाराशिव (जिमाका) जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणूक -२०२६ चा कार्यक्रम घोषित केला असून,कार्यक्रम घोषित झाल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे.

त्यामुळे जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या हद्दीतील धार्मिक स्थळे,रुग्णालये, शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यावर निर्बंध घालण्यात आला आहे.

जिल्ह्यातील धार्मिक स्थळे, रुग्णालये,शैक्षणिक संस्था व सार्वजनिक ठिकाणांच्या जवळपास तात्पुरती पक्ष कार्यालये स्थापन करण्यास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत (०७.०२.२०२६ पर्यंत) निर्बंध घालण्यात येत आहेत.

हे आदेश दि.१३ जानेवारी २०२६ ते ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत संपूर्ण जिल्ह्यात अंमलात राहतील.

# निवडणूक काळात रस्ते व सार्वजनिक ठिकाणी पोस्टर-बॅनर्सवर निर्बंध ; जिल्ह्यात ७ फेब्रुवारीपर्यंत आदेश

धाराशिव, (जिमाका)- जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केल्याने १३ जानेवारीपासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत,निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी तसेच सार्वजनिक सुरक्षितता व वाहतूक सुरळीत राहावी,या दृष्टीकोनातून सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यांवर निवडणूक साहित्य लावण्यावर प्रशासनाने निर्बंध घातले आहेत.

राजकीय पक्ष,निवडणूक लढविणारे उमेदवार,त्यांचे प्रतिनिधी किंवा हितचिंतक यांच्याकडून सार्वजनिक इमारतींच्या ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यांवर निवडणुकीसंबंधी पोस्टर्स,बॅनर्स, पॅम्प्लेट्स,कटआऊट्स,होर्डिंग्ज, कमानी आदी साहित्य लावल्यास रहदारीस अडथळा निर्माण होण्याची तसेच अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा प्रकारच्या कृतींवर निर्बंध घालणे आवश्यक असल्याने जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३३ (१)(डीबी) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून हे आदेश निर्गमित केले आहेत. या आदेशानुसार,निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत,म्हणजेच दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत,कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस अडथळा होईल किंवा अपघात होण्याची शक्यता निर्माण होईल अशा पद्धतीने कोणतेही निवडणूक साहित्य लावण्यास निर्बंध घालण्यात आले आहेत.हे आदेश दिनांक १३ जानेवारी २०२६ ते दिनांक ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण धाराशिव जिल्ह्यात अंमलात राहतील.

# निवडणूक कालावधीत जात,धर्म व भाषावार शिबिरे -मेळावे बंद; जिल्ह्यात सात फेब्रुवारीपर्यंत निर्बंध

धाराशिव,दि.१६ जानेवारी (जिमाका) राज्य निवडणूक आयोगाने १३ जानेवारी २०२६ रोजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केल्याने,त्या दिवसापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी,या उद्देशाने धाराशिव जिल्ह्यात महत्त्वाचा आदेश जारी करण्यात आला आहे.

निवडणूक कालावधीत जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या हद्दीत कोणत्याही प्रकारचे जात,धर्म किंवा भाषावार शिबिरे व मेळावे आयोजित केल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता,जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी किर्ती किरण पुजार यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ चा वापर करून जिल्ह्यात जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, म्हणजेच ७ फेब्रुवारी २०२६ पर्यंत, कुठेही कोणत्याही प्रकारचे जात,भाषा किंवा धार्मिक शिबिरे व मेळावे आयोजित करण्यावर निर्बंध घातले आहेत.

हे आदेश दिनांक १३ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत संपूर्ण धाराशिव जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या हद्दीत लागू राहतील.

# निवडणूक काळात अवैध दारूविक्रीवर कडक कारवाईचे निर्देश पोलीस पाटलांना तात्काळ माहिती देण्याचे आदेश

धाराशिव (जिमाका)- राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०२६ चा कार्यक्रम जाहीर केल्याने १३ जानेवारीपासून आदर्श आचारसंहिता अंमलात आली आहे. निवडणूक प्रक्रिया शांततेत, निर्भय व न्याय्य वातावरणात पार पडावी,या दृष्टीकोनातून अवैध दारूविक्रीबाबत प्रशासनाने महत्त्वाचे निर्देश दिले आहेत.

जिल्ह्यातील जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी संबंधित विभागांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील पोलीस पाटील यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रात कुठेही अवैध दारूविक्री होत असल्याचे निदर्शनास आल्यास, त्याबाबत तत्काळ नजिकच्या पोलीस स्टेशनला तसेच संबंधित विभागास माहिती देण्याबाबत सूचित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

अवैधरीत्या दारूविक्री होत असल्याचे आढळून आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधितांवर निश्चित करण्यात येईल,असेही स्पष्ट करण्यात आले आहे.निवडणूक काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी प्रशासनाने अवैध दारूविक्रीवर कठोर नजर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत.

# सहाव्या पंधरवाड्यात आलेल्या ऊसाचे बिल ४ कोटी ६२ लाख ५५ हजार ७३७ रूपये शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा



धाराशिव (प्रतिनिधी)- सहाव्या पंधरवाड्यात आलेल्या ऊसाचे बिल ४ कोटी ६२ लाख ५५ हजार ७३७ रूपये शेतकर्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती एनव्हीपी शुगरचे चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी दिली आहे.

तालुक्यातील जागजी शिवारातील एनव्हीपी शुगरच्या वतीने चाचणी गळीत हंगामापासून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अवघ्या पंधरा दिवसांत ऊसाचे बिल अदा करण्याची परंपरा एनव्हीपी शुगर परिवाराने सुरू केली आहे. द्वितीय गळीत हंगाम २०२५ - २६ मधिल सहाव्या पंधरवाड्यात ०१ जानेवारी ते १५ जानेवारी २०२६ या कालावधीतीत ऊस पुरवठा केलेल्या सर्व शेतकऱ्यांचे ऊसाचे बिल २७००/- प्रमाणे दि.१६ जानेवारी २०२६ रोजी संबंधित शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग करण्यात आले आहे.

तरी ज्या शेतकऱ्यांनी उस्मानाबाद जनता सहकारी बँकेचे खाते दिले आहे अशा शेतकऱ्यांनी बँकेत जाऊन आपले आपले बिल घ्यावे. ज्यांनी खाते दिले नाही अशा शेतकऱ्यांनी पवनराजे लोकसमृद्धी मल्टिस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.धाराशिव बँकेत जाऊन आपले बिल घ्यावे. तसेच जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी कारखान्यास ऊस देऊन सहकार्य करावे असे आवाहन चेअरमन नानासाहेब उर्फ बालाजी पाटील यांनी केले आहे.

# मोहेकर महाविद्यालयात जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा संपन्न; वसुंधरा गुरव व साक्षी वटाणे प्रथम




कळंब(प्रतिनिधी)- शिक्षण महर्षी ज्ञानदेव मोहेकर महाविद्यालय आणि चॅरिटेबल ट्रस्ट आयोजित 'संस्थामाता कै. सुमनबाई (वहिनी) मोहेकर जिल्हास्तरीय वक्तृत्त्व स्पर्धा' मोठ्या उत्साहात पार पडली. स्पर्धेचे हे दुसरे वर्ष होते. बीडचे कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप मडके यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले, तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव डॉ. अशोकराव मोहेकर होते.

या स्पर्धेत शालेय (४२) आणि महाविद्यालयीन (१६) अशा एकूण ५८ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आणि सुप्त गुणांना व्यासपीठ मिळवून देण्यासाठी अशा स्पर्धा महत्त्वाच्या आहेत, असे प्रतिपादन यावेळी रामराजे चांदणे यांनी केले.

स्पर्धेचा निकाल:

* शालेय गट: * प्रथम: वसुंधरा संजय गुरव (धाराशिव) * द्वितीय: राशी हनुमंत खोत (तेरखेडा) * तृतीय: वीरेन गणपती आडसूळ (घारगाव) * (उत्तेजनार्थ: रिया आडसूळ, ज्ञानेश्वरी धावडे, अमृता शिंदे, सुषमा मोरे, ईश्वरी बारस्कर)

* महाविद्यालय गट: * प्रथम: साक्षी बाळासाहेब वटाणे (मोहेकर महाविद्यालय)

* द्वितीय: प्रतीक्षा शिवाजी लिमकर (परंडा) * तृतीय: समर्थ लक्ष्मण लोंढे (नळदुर्ग)

* (उत्तेजनार्थ: ऋषिकेश वाघे, अश्विनी गिरी, आकाश बारस्कर, आदित्य चव्हाण, सिद्धी पाटील) परीक्षक म्हणून प्राचार्य महादेव गपाट, हरिश्चंद्र ओताडे, डॉ. गणेश पाटील, प्रा. सुनील भिसे, व्ही. एच. चेवले, सोपान पवार व मुस्तान मिर्झा यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन डॉ. दीपक सूर्यवंशी, पारितोषिक वाचन डॉ. दादाराव गुंडरे यांनी केले, तर आभार श्री. अरविंद शिंदे यांनी मानले. यशस्वीतेसाठी किरण बारकुल, सारुख शेख, अक्षय खंडागाळे, संतोष मोरे, डॉ.जयवंत ढोले,डॉ.नामानंद साठे, डॉ. ज्ञानेश चिंते, संदीप सूर्यवंशी, आदित्य मडके, उमेश साळुंके व महाविद्यालयातील विविध समित्यांनी परिश्रम घेतले.

# रहदारीस धोकादायरीत्या वाहन उभे करणाऱ्यांवर गुन्हे नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)-आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत विजयकुमार रा. उत्तमी(का) ता. जि. धाराशिवह.मु. सुशिलानगर, ओम मंगल कार्यालय पाठीमागे धाराशिव, रामेश्वर रा. सांजा रोड, धाराशिव, विशाल रा. उपळा मा. ता. जि. धाराशिव, आयुब रा. जुना बस डेपो धाराशिव ता. जि. धाराशिव,संतोष रा.सांगवी ता. जि. धाराशिव यांनी दि.१८.०१.२०२६ रोजी ११.३० ते १८.०१.२०२६ रोजी ११.५० वा. सु. आपआपल्या ताब्यातील अनुक्रमे वाहन क्र एमएच २५ एके ००९५, वाहन क्र एमएच२५ एके १८५५,वाहन क्र एमएच २५ एन ०३९९, रिक्षा क्र एमएच ०९ ईएल०६३० व रिक्षा क्र एमएच २५ ए.के.०६३२ ही वाहने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते येडशी कडे जाणारे रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना आनंदनगर पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द आंनदनगर पो. ठा. येथे स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

नळदुर्ग पोलीस ठाणे अंतर्गत लक्ष्मण वय ३० वर्षे, रा. इंदीरानगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.१८.०१.२०२६ रोजी १२.०० वा. सु. आपल्या ताब्यातील रिक्षा क्र एमएच २५ ए.के. २२५९ हा नळदुर्ग बसस्थानक परिसरात उजव्या गेटसमोर रोडवर सार्वजनिक रस्त्यावर रहदारीस धोकादायकरीत्या उभे केलेले असताना नळदुर्ग पोलीसांना मिळून आले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द नळदुर्ग पो.ठा. येथे गुन्हा नोंदवला आहे.

# अवैध गांजा जवळ बाळगून विक्री करणाऱ्यांवर गुन्हा दाखल

लोहार(प्रतिनिधी)-पोलीस ठाणे अंतर्गत अवैध गांजा विरोधी कारवाई दरम्यान लोहारा पोलीसांनी दि.१८.०१.२०२६ रोजी लोहारा पो ठाणे हद्दीत गोरीबी, अली, दोघे रा. जेवळी उत्तर ता. लोहारा जि. धाराशिव हे १७.२० वा.सु. आपल्या राहते घरात जेवळी येथे ५,२६६ कि. ग्रॅम वजनाचे गांजा सदृश्य अम्ली पदार्थ एकुण १,०५,३२० किंमतीचे चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने स्वत:चे कब्जात बाळगलेले लोहारा पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी नमुद मुद्देमाल जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द एन.डी. पी.एस. क्ट कलम- ८(क), २०(बी), ii(ब)अन्वये लोहारा पो.ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# पानबुडी व वायरखची चोरी: गुन्हा दाखल

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी विजय महादेव गुरव, वय ३३ वर्षे, रा. सिध्देश्वर वडगाव ता. जि. धाराशिव यांचे वडगाव सी शिवारातील शेत गट नं ३८६ मधून एक ०५ एच.पी. ची इलेक्ट्रीक पानबुडी रेम्को कंपनीची मोटार व ६० फुट वायर असा एकुण १२,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी विजय गुरव यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.


**Name of Change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was :
**FAKIR TAUFIK SHARTAJ**
TO: **TAUFIK SHARTAJ PATEL**
Hence for this Declaration i will be known by this name and will use **TAUFIK SHARTAJ PATEL** in future the same will used by my family wife, children and relative.
OLD NAME :- **FAKIR TAUFIK SHARTAJ**
NEW NAME :- **TAUFIK SHARTAJ PATEL**
Address - At Telernagar Post Dindegaon Keshegaon Taluka Tuljapur DIST. Osmanabad. -413603
Adhar No.-289892150974 Mob.8788712668



**लातूर समाचार धाराशिव**

**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**

**9422472502**
**9175325708**


## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक ,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649